सहकार भारतीचे मुखपत्र


बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

ISBN 978-81-940842-0-4

# सहकार सुगंध

• पुणे • वर्ष : २१ • अंक ०३ • जून २०२५ • पृष्ठे ४० • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी

## सहकार कायद्यात आवश्यक बदल करण्यासाठी समिती : मुख्यमंत्री






## डेअरी राष्ट्रीय अधिवेशन

दूध व्यवसायाच्या प्रगतीसाठी सहकार भारती आयोजित राष्ट्रीय अधिवेशनात व्यापक चर्चा

## महिला बचतगट महोत्सव, पुणे

सहकार भारती आयोजित पहिल्या बचतगट महोत्सवाला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




आपला परिवार, आपली संस्था!
स्थापना-१९९४
तुमचे सोने करेल,
तुमचे स्वप्न साकार!
अक्षय तृतिया
गोल्ड लोन
0.75*%
व्याजदर प्रती माह
* अटी व नियम लागू
• सुलभ प्रक्रिया
• जलद कर्ज वाटप
• किमान दस्तऐवज
अधिक माहितीकरीता संपर्क
9822272947
9665936970
योजना सर्व शाखेत सुरु
आजच जवळच्या शाखेत संपर्क करा
24x7 मोबाईल बँकिंग
आता
NEFT
RTGS
IMPS
UPI
आपल्या मोबाईल द्वारे कुठेही, कधीही
बँकिंग व्यवहार तुमच्या मोबाईल वर
डिजिटल बँकिंग सुविधा
Cash Less बँकिंग व्यवहार
सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था
तुमच्या सेवेत सदैव तत्पर
LOCKERS सुविधा
SMS अलर्ट
DEPOSIT सुविधा
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
MOBILE बँकिंग
₹ 2335 कोटींच्या वर व्यवसाय
GOLD LOAN उपलब्ध
CORE बँकिंग
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
LOAN सेवा सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)
31 वर्षे विश्वासाचे
मुख्य कार्यालय : प्लॉट नं 42-अ सीताराम भवन, हनुमान मंदीर समोर, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-440010.
फोन : 0712-2220716, 2524337, 2520303



कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
र.नं. ८९९
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा
ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था
बँको पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
आधारवड
रा.ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
26 जुन
राजर्षी शाहू महाराज
जयंती निमित्त
विनम्र अभिवादन..!
संदीप शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू मल्टीस्टेट
अध्यक्ष राजर्षी शाहू परिवार
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा
तुमच्या सेवेत सदैव तत्पर..!
LOCKERS सुविधा
NEFT,RTGS सुविधा उपलब्ध
GOLD LOAN उपलब्ध
MSEDCL वीज बिल भरणा केंद्र
DEPOSITE सुविधा
SMS अलर्ट
MOBILE बँकिंग
CORE बँकिंग
LOAN सेवा सुविधा
अनेक प्रकारच्या पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
DOORSTEP बँकिंग
NET बँकिंग
SHAHU PAY
Missed Call
WhatsApp Banking
Shahu Pay
खातेदारांना पेपरलेस सुविधा देणारी राजर्षी शाहू एकमेव पतसंस्था
शाहू पे द्वारे कोणत्याही शाखेमध्ये जमा स्लीप किंवा विड्रॉल फॉर्म न भरता QR कोड स्कॅन करून व्यवहार करता येईल.
संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकूण ६९ शाखेचा विस्तार
२. ८०० कोटींचा व्यवसाय
३. १००००० सभासद संख्या
४.'शाहू पे' हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ३५ हजार महिलांना १२५ कोटी रू. चे कर्ज वाटप
अपेक्षेपेक्षा अधिक लाभ देणारी विश्वसनीय संस्था
अखंड वाढ आपल्या गुंतवणुकीची..!
दाम दुप्पट ठेव योजना
सोने तारण कर्ज
वेअर हाऊस कर्ज
अल्पबचत कर्ज
वाहन तारण कर्ज
बचत गट कर्ज
राजर्षी शाहू विशेष लखपती ठेव योजना
> २४५०/- रू. प्रतिमाह ३६ महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> १७००/- रू. प्रतिमाह ४९ महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> १३५०/- रू. प्रतीमाह ६० महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> ६५०/- रू. प्रतीमाह ६२ महिने भरा मिळवा रु.५०,०००/-
सौ. मालती संदीप शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com
+९१ - ९५२८४९०४९०

netwin
Ideas to Life

# आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सह स्मार्ट बँकिंगचा नवा अनुभव!



- शासकीय नियमावलीवर आधारित अत्याधुनिक कोअर बँकिंग सोल्यूशन
- NPA व्यवस्थापन आणि सुबक रिपोर्ट्सची सुविधा
- सुलभ कर्ज अर्ज – सुरक्षित, सोपी आणि जलद डिजिटल प्रक्रिया!
- संस्थेच्या वाढीसाठी NetPay UPI QR कोड सुविधा

Certification

netwin
Ideas to Life

नाविन्य, विश्वास आणि गुणवत्तेचं प्रतीक.


- AI-सक्षम प्रणालीद्वारे आधुनिक आणि गतिमान बँकिंग सेवा
- तुमचा चेहरा तुमची ओळख – खाते उघडण्यासाठी फक्त एक सेल्फी पुरेशी!
- आधार OTP आणि डिजिटल ई-केवायसी द्वारे खाते सुरू करा
- बायोमेट्रिक वर आधारित अचूक प्रमाणीकरण
- स्मार्ट डॅशबोर्ड्स आणि रिअल टाईम डेटा नियंत्रणाची सुविधा
- संपूर्णतः पेपरलेस, जलद आणि सुरक्षित व्यवहार अनुभव

आजच आपल्या संस्थेला बनवा AI-सक्षम!

०२५३ ६६५ १५००

अधिक माहितीसाठी स्कॅन करा

sales@netwinindia.in
www.netwin.in


50+ YEARS OF MOMENTUM
अर्थ सहकारेण कल्याणम्
दि कल्याण जनता सहकारी बँक लि.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
तुमच्या उच्च शैक्षणिक स्वप्नांना आर्थिक पाठबळ देणारी बँक
एकूण शैक्षणिक खर्चाच्या 90% कर्ज उपलब्ध.*
प्रोसेसिंग शुल्क व प्रिपेमेंट शुल्क नाही.
कल्याण सरस्वती (शैक्षणिक कर्ज योजना)
* अटी व शर्ती लागू
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.in
KJSBank


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
घर तुमच्या स्वप्नातले पूर्तता आमच्या साथीने
टीजेएस्बी
गृह कर्ज
मर्यादा ₹3 करोड*
8.25% वार्षिक*
*अटी लागू
www.tjsbbank.co.in | Toll Free: 1800 266 3466 | 1800 103 466

|| बिना संस्कार नहीं सहकार । बिना सहकार नहीं उद्धार ||

# अनुक्रम


* सहकारी दुग्धव्यवसाय क्षेत्रासाठी तीन नवीन बहु-राज्य सहकारी समित्या होणार ........०९
* महिला सक्षमीकरणासाठी सकारात्मक व्यासपीठाला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ......१०
* दूध व्यवसायाच्या प्रगतीसाठी राष्ट्रीय अधिवेशनात व्यापक चर्चा ........................१२
* सहकार विभागाची अर्धन्यायिक निर्णय प्रक्रिया आणखी जलद - मुख्यमंत्री फडणवीस१३
* को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या प्रगतीसाठी संचालकांची भूमिका महत्त्वाची ......१४
* त्रिभुवन सहकारी विद्यापीठ कार्यकारी मंडळावर सतीश मराठे ........................१५
* डिजिटल युगात समाविष्ट होण्यासाठी सहकारी बँकांनी नवीन सॉफ्टवेअर मॉडेलचा विचार करणे हितकारक !..........................................................१६
* विकास सहकारी सोसायट्या सक्षम करण्याची प्रक्रिया वेगाने सुरु ....................१७
* सहकार कायद्यात कालानुरूप बदल करण्यासाठी समिती स्थापन करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सूतोवाच...........................................१८
* सहकाराची सर्वप्रथम मुहूर्तमेढ महाराष्ट्रात!..............................................१९
* सहकार भारती अहिल्यानगर जिल्हा अध्यक्षपदी वासुदेव काळे ..........................२०
* पतसंस्थेमधील गुंतवणुकीवरील परतावा आयकर मुक्त -सहकार आयुक्त तावरे ...२१
* दि मालाड सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची बिनविरोध निवड.......................२२
* 'महाराष्ट्र सहकारी मुद्रणालया'चे शिल्पकार : नरूभाऊ लिमये.........................२३
* रिझर्व बँक ऑफ इंडियाची शीघ्र सुधारकृती चौकट ....................................२४
* श्री आर्य चाणक्य नागरी सहकारी पतसंस्था प्रधान कार्यालयाचे उद्घाटन................२५
* भारत रत्न सहकारिता सन्मानमध्ये देवगिरी नागरी सहकारी बँकेचे तिहेरी यश ...........२६
* सहकारी बँकेतील सीईओसाठी एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम सुरु होणार...........२७
* संचालक व ठेवीदारांना प्रशिक्षणाची गरज - अनास्कर यांची सूचना ...................२८
* सहकारी बँकांनी ग्राहक, लोकाभिमुख व्हावे - उपमुख्यमंत्री अजित पवार..........२९


## जानेवारी २०२५ पासून 'मॅगझीन पोस्ट' द्वारा वितरण

सहकार सुगंधचा अंक न मिळण्याच्या तक्रारी असल्याने पोस्ट खात्याच्या नवीन मॅगझीन पोस्ट यंत्रणेद्वारे वर्गणीदारांना १००% अंक मिळण्याची खात्री यापुढे राहणार आहे. या मॅगझीन पोस्टचा खर्च अधिक असल्यामुळे नाईलाजाने वर्गणीचे दर वाढवावे लागत आहेत. तरी कृपया वर्गणीदार, वाचक, जाहिरातदार यांनी आवश्यक सहकार्य करून नवीन दराप्रमाणे नोंदणी करावी, ही विनंती. – संपादक


'सहकार सुगंध' हे मासिक मालक, सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक भालचंद्र कुलकर्णी यांनी एन. आर. एंटरप्रायजेस, स.नं. ३९, माणिकबाग इंडस्ट्रियल इस्टेट, सिंहगड रोड, पुणे - ४११ ०५१ येथे छापून ए-१२, निखिल पार्क सी सोसायटी, माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे - ४११ ०५१ येथे प्रसिद्ध केले.
**संपादक** - भालचंद्र कुलकर्णी

'Sahakar Sugandha' monthly is owned by 'Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., printed & published by Bhalchandra Kulkarni, Printed at N. R. Enterprises, S.No. 39, Manikbaug Industrial Estate, Sinhgad Road, Pune - 411051 & published at A-12, Nikhil Park, 'C' Society, Manikbaug, Sinhgad Road, Pune - 411051.
Editor : Bhalchandra Kulkarni



# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

**जून २०२५ (वर्ष २१, अंक ०३)**

**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे


**दि. १ जानेवारी २०२५ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ७००/- फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १८००/- फक्त
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**कृपया चेक / डीडी 'सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.' या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)**


**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# बचतगट : आत्मनिर्भर स्त्रीशक्तीची ओळख!

आपल्या ग्रामीण आणि निमशहरी भारतात जेथे आर्थिक अपुऱ्या संधी, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक बंधने अजूनही महिलांसमोर अडचण म्हणून उभी राहतात, तेथे एक शांत पण ठाम क्रांती घडत आहे. ती म्हणजे महिला स्वयंसहायता बचतगटांची चळवळ. ही चळवळ म्हणजे केवळ अर्थसहाय्याची योजना नाही, तर ती आत्मविश्वास, एकजूट आणि सशक्तीकरणाची खरी चळवळ ठरत आहे. ज्याला सहकार तत्त्वांचा आधार आहे. भारतातील सहकाराची संस्कृती दर्शविणारी ही चळवळ आहे.

गेल्या दोन दशकांत अशा हजारो बचतगटांनी ग्रामीण महिलांना त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक चौकटीबाहेर जाऊन स्वबळावर उभे राहण्याची प्रेरणा दिली आहे. घराच्या चार भिंतीतून बाहेर पडून महिला आता उद्योजक, प्रशिक्षक आणि समाजपरिवर्तनाच्या चालक बनत आहेत. महिला बचतगटांचे यश केवळ त्यांच्या लघु अर्थसंचालनात नाही. व्यवसाय उभारणी, शेतीपूरक उद्योग, अन्नप्रक्रिया, शिवणकाम, हस्तकला यासारख्या क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय प्रगती केली आहे. अनेक गटांनी तर स्थानिक बाजारपेठेत स्वतःची ओळख निर्माण केली आहे आणि काही गट ई-कॉमर्सच्या माध्यमातूनही मोठा व्यवसाय करीत आहेत.

या बचतगटांमुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक सशक्ततेसह एक सामाजिक आत्मभान जागृत होत आहे. महिलांच्या निर्णय क्षमतेत वाढ, आत्मभान, सन्मान आणि हक्क यांची जाणीव अधिक बळकट होत आहे. अनेक गट गावपातळीवरील प्रशासनात, ग्रामसभांमध्ये सक्रिय सहभाग घेतात. हीच खरी लोकशाही आहे, जिथे सामान्य स्त्रीचा आवाज ऐकून घेतला जातो. पण अजूनही या चळवळीला अधिक बळ देण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रशिक्षण, बाजारपेठेची उपलब्धता, तांत्रिक सहाय्य आणि पतपुरवठा यामध्ये सातत्यपूर्ण प्रयत्नांची, म्हणजेच खऱ्या सहकाराच्या पाठिंब्याची गरज आहे. शासन, स्वयंसेवी संस्था आणि समाजातील सक्षम घटकांनी हे दायित्व अधिक गांभीर्याने घ्यावे, हीच आजच्या घडीची गरज आहे. सहकार क्षेत्रातील धुरीणांनी याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे.

आज महिला बचतगट हे 'स्वयंसहाय्यते'चे प्रतिक नाही तर 'समूहशक्तीच्या सामर्थ्याचा जिवंत पुरावा' आहेत. त्यांच्या यशाच्या कथा फक्त आकड्यांमध्ये नव्हे, तर त्यांच्या डोळ्यांत चमकणाऱ्या आत्मविश्वासात आणि त्यांच्यात जागृत झालेल्या नेतृत्वगुणांमध्ये दिसून येतात. या चळवळीला सलाम करत, आपण सारेच या स्त्रीशक्तीला हातभार लावण्यासाठी सज्ज होऊ या. कारण स्वयंपूर्ण भारताची वाट आत्मनिर्भर महिलांमधूनच जाते.

आपल्या देशात महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध स्तरांवर प्रयत्न केले जात आहेत. त्यातील एक प्रभावी माध्यम म्हणजे महिला स्वयंसहायता बचतगट. हे गट ग्रामीण तसेच शहरी भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखवतात. महिला स्वयंसहाय्यता बचतगट हे केवळ आर्थिक व्यवहाराचे माध्यम नसून सामाजिक परिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. बचतगटांच्या या चळवळीमुळे महिलांची वाटचाल सबला ते समर्थ, शक्तीशाली महिला अशी होतांना दिसते आहे. सहकार क्षेत्राची ही मोठी उपलब्धी आहे.

सहकार भारतीच्या माध्यमातून संपूर्ण देशभरात महिलांद्वारे बचत गटांबरोबरच विविध प्रकारचे उद्योग-व्यवसाय चालविले जात आहेत. सहकार चळवळीतील एक प्रमुख घटक म्हणून महिलांच्या कार्याची दखल सहकार भारतीने घेतली आहे. त्यादृष्टीने विविध प्रकारचे उपक्रम राबविले जात आहेत. यामध्ये अधिकाधिक महिलांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन आहे.

जय सहकार !



संपादकीय...

# सहकारी दुग्धव्यवसाय क्षेत्रासाठी तीन नवीन बहु-राज्य सहकारी समित्या होणार



**नवी दिल्ली –** 'सहकार से समृद्धी' या मंत्राला पुढे नेत, सहकारी दुग्धव्यवसाय क्षेत्रासाठी तीन नवीन बहु-राज्य सहकारी समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. पहिली समिती 'पशुखाद्य उत्पादन, रोग नियंत्रण आणि कृत्रिम रेतन', दुसरी समिती 'शेण व्यवस्थापन मॉडेल विकसित करणे' आणि तिसरी समिती 'मृत गुरांच्या अवशेषांच्या चक्रीय वापराला प्रोत्साहन देईल' असे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी सांगितले.

केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली येथे सहकारी दुग्धव्यवसाय क्षेत्रात सस्टेनेबिलिटी (शाश्वतता) आणि सर्क्युलॅरिटी (चक्रीयता) या विषयावर महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीला केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल सिंह गुर्जर, मुरलीधर मोहोळ सहकार मंत्रालयाचे सचिव आशीष भूटानी, दुग्धव्यवसाय आणि पशुपालन विभागाच्या सचिव अलका उपाध्याय, राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. मीनेश शाह सहभागी झाले होते.

**केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली येथे सहकारी दुग्धव्यवसाय क्षेत्रात सस्टेनेबिलिटी (शाश्वतता) आणि सर्क्युलॅरिटी (चक्रीयता) या विषयावर महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. याविषयीचे सचित्र वृत्त...**

**※ श्वेतक्रांतीच्या दिशेने वाटचाल –**

बैठकीला संबोधित करताना केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री म्हणाले की, आपण श्वेत क्रांतीच्या दिशेने वाटचाल करत असताना, ध्येय केवळ दुग्ध सहकारी संस्थांचा विस्तार करणे आणि त्यांना कार्यक्षम आणि प्रभावी बनवणे, एवढेच मर्यादित नसावे तर शाश्वत आणि चक्राकार अर्थव्यवस्थेला चालना देणारी दुग्ध परिसंस्था निर्माण करायला हवी. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवायचे असेल तर एकीकृत सहकारी संस्थांचे जाळे तयार करावे लागेल, जिथे बहुतांश काम परस्पर सहकार्य आणि सहकाराद्वारे होईल, असे त्यांनी सांगितले.

**※ दूध व्यवसायाला शाश्वत करणार –**

वैज्ञानिक मॉडेलद्वारे कार्बन क्रेडिटचे थेट लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावेत, यावर विशेष भर त्याचबरोबर त्यांनी दूध संघ आणि सहकारी समित्यांना बळकटी देण्याची आणि डेअरी संयंत्रांमध्ये अन्न प्रक्रियांना प्रोत्साहन देण्याच्या गरजेवर भर दिला. हे प्रयत्न केवळ शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणार नाहीत तर दूध व्यवसाय क्षेत्राला अधिक शाश्वत आणि पर्यावरण-स्नेही बनवण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल आहे, असे केंद्रीय सहकार मंत्री शाह यांनी सांगितले.

**※ सहकार हा ग्रामीण विकासाचा मूलमंत्र –**

सहकार हा ग्रामीण विकासाचा मूलमंत्र आहे सहकारी दुग्ध क्षेत्र हे याचे एक उत्तम उदाहरण आहे, जे लाखो ग्रामीण कुटुंबांना उपजीविकेचा एक महत्त्वाचा स्रोत असतो. दुग्ध सहकारी संस्था दूध उत्पादन आणि विपणनाच्या माध्यमातून भारतीय दुग्ध क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे ते म्हणाले. या समित्या लहान शेतकऱ्यांना स्थिर बाजारपेठ, कर्ज सुविधा, पशुवैद्यकीय चिकित्सा आणि प्रजनन यासारख्या सेवा देऊन केवळ ग्रामीण अर्थव्यवस्थाच मजबूत करत नाहीत तर महिलांचा सहभाग वाढवून त्यांना सक्षम बनवत आहेत, अशी माहिती त्यांनी सांगितली.

**※ 'शाश्वतता ते चक्रीयता' –**

'शाश्वतता ते चक्रीयता' हा प्रवास करायचा आहे, जो बहुआयामी असेल आणि आज खासगी क्षेत्र जे काम करत आहे ते शेतकऱ्यांच्या स्वतःच्या सहकारी संस्थांद्वारे केले जाईल, असे ते म्हणाले. यामध्ये तांत्रिक सेवा, पशुखाद्य, कृत्रिम रेतन, पशु रोग नियंत्रण, शेण व्यवस्थापन तसेच दुग्धव्यवसाय आणि संबंधित क्षेत्रातील संकलनापासून प्रक्रिया करण्यापर्यंतच्या क्रियाकलापांचा समावेश आहे, असे ते म्हणाले.

**※ सहकारातील सहकार्य महत्त्वाचे –**

अमूलसारख्या यशस्वी सहकारी प्रारूपांचा उल्लेख करत सहकार मंत्री म्हणाले की, सहकारातून समृद्धी हे स्वप्न साकार होत आणि सहकारातील सहकार्य यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सहकार मंत्रालय विविध मंत्रालये आणि भागधारकांच्या सहकार्याने दुग्ध क्षेत्रातील हे यश केवळ पुढेच नेत नाही तर ग्रामीण पातळीवरील सहकारी संस्थांना इतर उपक्रमांशी जोडून त्यांचा विस्तार आणि बळकटीकरण देखील करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकसित भारताचे ध्येय एकात्मिक पद्धतीने साध्य करण्यासाठी हे सर्व प्रयत्न उपयुक्त ठरतील.

सहकार मंत्रालय आणि मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयांनी सर्व भागधारकांना एकत्र आणले आहे. त्यामुळे आता धोरण निश्चिती, वित्तपुरवठा करण्यापासून ते गावपातळीवरील सहकारी संस्थांची स्थापना आणि त्यांना बहुउद्देशीय बनवण्यापर्यंतचे काम जलद गतीने होत आहे. एनडीडीबीने शाश्वततेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण काम केले आहे आणि त्यांनी विकसित केलेले बायोगॅस आणि गोबर व्यवस्थापन कार्यक्रम देशभरात विस्तारित होत आहेत. हे आणखी पुढे नेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ, राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ, नाबार्ड इत्यादी सहकारी संस्थांच्या उन्नतीसाठी काम करणाऱ्या राष्ट्रीय संस्थांचे कौतुक त्यांनी केले.

## सहकार भारती आयोजित बचत गट महोत्सव

# महिला सक्षमीकरणासाठी सकारात्मक व्यासपीठाला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**महिला बचत गटाच्या माध्यमातून उत्पादित केलेल्या अनेकविध वस्तूंचा दोन दिवसीय महोत्सव सहकार भारतीच्या वतीने प्रथमच पुण्यनगरीत आयोजित करण्यात आला होता. राज्याच्या विविध जिल्ह्यातून या महोत्सवात बचत गट सहभागी झाले होते. यापुढील काळातही हा उपक्रम दरवर्षी हाती घेण्यात येणार आहे.**

**पुणे** – राज्याच्या विविध जिल्ह्यातील महिला बचत गटांनी तयार केलेली विविध उत्पादने, खाद्यपदार्थ आणि वस्तु याला बाजारपेठ मिळावी. तसेच महिला सक्षमीकरणासाठीचे एक सकारात्मक पाऊल यादृष्टीने सहकार भारतीच्या वतीने दोन दिवसीय बचत गट महोत्सवाचे प्रथमच आयोजन करण्यात आले होते. एका अर्थाने नवे व्यासपीठ मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात आला. विशेष म्हणजे या महोत्सवाला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दोन दिवसीय बचत गट महोत्सवात विविध जिल्ह्यातील जवळपास ९० विविध उत्पादनांचे स्टॉल्स होते. त्यामध्ये सोलापूर, सांगली, नाशिक, सातारा, कोकण, पुणे अशा विविध जिल्ह्यातून बचत गट सहभागी झाले होते. उत्पादनामध्ये विविधता असल्याने निवडीसाठी ग्राहकाना भरपूर वाव मिळाला. विशेष म्हणजे या स्टॉलमध्ये चार स्टॉल हे दिव्यांगांसाठी होते. या महोत्सवात जवळपास पांच लाखांपेक्षा अधिक उलाढाल झाली असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

**वैविध्यपूर्ण उत्पादने ठरली महोत्सवाचे आकर्षण**

**※ विविध उत्पादनांनी स्टॉल्स सजले –**

या स्टॉलवर विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, मसाले, विविध प्रकारचे पापड, सोलार दिवे, पुजा साहित्य, कॉस्मेटिक वस्तू, कपडे, दैनंदिन वापरातल्या वस्तू आणि उत्पादने, विविध वासांचे साबण, तसेच भांडी उपलब्ध करण्यात आली होती. यातील अनेक पदार्थ पारंपरिक पद्धतीने तयार करण्यात आले होते. घरगुती पद्धतीने आणि बचत गटाच्या माध्यमातून तयार करण्यात आलेली उत्पादने विक्रीसाठी स्टॉलवर होते. विशेष म्हणजे सहकार भारतीच्या या उपक्रमाला पुणेकरांनी तितकेच उचलून धरले. एका अर्थाने महिला सक्षमीकरणाच्या प्रयत्नाला पुणेकरांनी मोठा प्रतिसाद देऊन हातभार लावला.

केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर, सहकार भारती प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, प्रदेश संघटक शरद जाधव, सहकार भारती शहर अध्यक्ष सीए दिनेश गांधी, पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर, महिला बचत गट प्रमुख मंगल सोनवणे, बुलढाणा अर्बनचे शिरीष देशपांडे, राष्ट्रीय बँक प्रकोष्ठ प्रमुख अभय माटे, सहकार सुगंध संपादक भालचंद्र कुलकर्णी, प्रदेश कार्यालय प्रमुख श्रीकांत पटवर्धन, प्रदेश सहकोषाध्यक्ष औदुंबर नाईक, आयटी प्रकोष्ठ प्रमुख अजय निकुंभ, राज्य अर्बन को-ऑप. बँक असोसिएशन अध्यक्ष भाऊ कड, शहर महामंत्री वसंत गुंड, पुणे महानगर संघटन प्रमुख नीलकंठ नगरकर, बचत गट प्रकोष्ठ प्रमुख भाग्यश्री बोरकर, सहप्रमुख सुवर्णा भरेकर, आमदार हेमंत रासने तसेच सहकार भारतीचे शहराचे पदाधिकारी, आदींनी महोत्सवाला भेट दिली.

**※ बचत गटांना एक नवे व्यासपीठ –**

सहकार राज्यमंत्री मोहोळ यांनी महोत्सवास






भेट देऊन विविध स्टॉल्सवर जाऊन माहिती घेतली. त्यानंतर बोलताना सांगितले की, सहकार भारतीच्या वतीने घेण्यात आलेला सामाजिक उपक्रम हा नक्कीच स्वागतार्ह आहे. या माध्यमातून बचत गटांना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. सहकार चळवळीला सक्षम करण्याच्या प्रक्रियेला हातभार लागला आहे आणि महोत्सवाच्या माध्यमातून ग्राहकांना विविध उत्पादने उपलब्ध होणार आहेत.

**※ .....तर बचत गटांना उज्वल भवितव्य –**

महोत्सवाचे उद्घाटन करताना प्रशासक अनास्कर यांनी सांगितले की, महिलांनी तयार केलेल्या विविध वस्तू आणि उत्पादने यांना योग्य बाजारपेठ मिळणे आवश्यक आहे. विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून महिलांना सहकार्य मिळाल्यास उत्पादने जगभर जाण्यास मदत होणार आहे. महिला कष्ट करतात आणि कितीही अडचणी आल्या तरी त्यावर मात करून पुढे जाण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. सहकारी बँका अथवा सहकारी संस्थांच्या वतीने बचत गटांनी तयार केलेली विविध उत्पादने दिवाळीनिमित्त भेटवस्तू म्हणून देण्याची आवश्यकता आहे. तसेच बचत गटांसाठी स्वतंत्र मॉल तयार करण्याची गरज आहे, यासाठी आवश्यक ते सहकार्य देण्याची तयारी आहे. बचत गटांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळाली तर बचत गटांना उज्वल भवितव्य आहे, यापुढील काळात देखील ठिकठिकाणी महोत्सवाचे आयोजन करण्यात यावे, असे ते म्हणाले.

**※ बचत गट महोत्सव दरवर्षी होणार –**

शहराध्यक्ष गांधी यांनी सांगितले की, यंदा प्रथमच ना नफा ना तोटा या तत्त्वांवर बचत गट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या पहिल्या वहिल्या प्रयत्नास अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला आहे. बचत गट सक्षम झाले पाहिजेत हा या आयोजनेमागचा हेतू होता. या उपक्रमासाठी राज्य सहकारी बँक, पुणे महानगर पालिका आणि अन्य सहकारी संस्थांचे सहकार्य मिळाले. त्यामुळे स्टॉल धारकांना माफक दरात सुविधा उपलब्ध करून देता आल्या. हा महोत्सव दरवर्षी म्हणजेच ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान आयोजन करण्याचा प्रयत्न आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला अधिक सक्षम करण्यामध्ये सहकार क्षेत्राचा मोठा वाटा आहे. महोत्सवाच्या ठिकाणी ग्राहकांना खाद्य पदार्थ तयार करून देता आले नाही. तसेच स्टॉल धारकांना निवासाची व्यवस्था उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे असे ते म्हणाले.

**※ प्रतिक्रिया –**

**※ पारंपरिक पद्धतीचे खाद्यपदार्थ –**

नाशिकच्या प्रतिसाद बचतगटाच्या प्रमुख रूपाली माळी यांनी सांगितले की, पारंपरिक पद्धतीने तयार केले पदार्थ, घिबडी तसेच मसाले, विविध प्रकारचे पापड तयार करून स्टॉलवर उपलब्ध करण्यात आले. विशेष म्हणजे विविध प्रकारचे पदार्थ गेली २५ ते ३० वर्षे घरगुती व्यवसायाच्या माध्यमातून तयार करण्यात येतात. तसेच बचत गटांच्या महिलांना प्रशिक्षण देण्याची सुविधा करण्यात आली आहे. बचत गट महोत्सवाला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक होता.

**※ नैसर्गिक साबण उपलब्ध –**

वसुंधरा क्रिएशनच्या स्मिता कुंजीर यांनी सांगितले की, घरगुती स्तरावर जवळपास दहा विविध स्वरूपाचे आणि सुगंधी युक्त नैसर्गिक असे साबण तयार करण्यात येतात. त्याला मागणीचे प्रमाण चांगले आहे. याखेरीज विविध प्रकारचे ड्रेस, लेहेंगे, बेबी फ्रॉक, साडी कव्हर, हँडबॅग, मनीबॅग आदी वस्तू तयार करून देण्यात येतात. विविध वस्तूंना विविध भागातून येणारी मागणीदेखील मोठ्या प्रमाणावर आहे असे त्यांनी सांगितले.

**※ नाचणीचे अनेकविध खाद्य पदार्थ –**

सातारा जिल्ह्यातील नारीज फूड्सच्या वतीने चवीला उत्तम, जीवनसत्त्वयुक्त, लोहयुक्त असे अनेकविध खाद्यपदार्थ महोत्सवात उपलब्ध करण्यात आले होते. यामध्ये नाचणी सत्त्व मिक्स फ्रूट्स, तसेच काजू बदाम, ड्राय फ्रूट्स, नाचणी पाणी पुरी आणि मसाला भाकरी, रागी भाकरी, जीरा भाकरी, बाजरा मेथा भाकरी, फराळी भाकरी आदी पदार्थ स्टॉलवर ठेवण्यात आले होते आणि ग्राहकांच्या पसंतीस उतरले.



# सहकार भारती डेअरी प्रकोष्ट आयोजित
# दूध व्यवसायाच्या प्रगतीसाठी राष्ट्रीय अधिवेशनात व्यापक चर्चा




**गुजरात – आणंद –** सहकार भारती डेअरी प्रकोष्टाच्या वतीने दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन येथे नुकतेच पार पडले. दोन दिवसीय अधिवेशनात दुधाची गुणवत्ता, ती वाढविण्यासाठी उपाययोजना आदी विषयावर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

गुजरातचे सहकार मंत्री जगदीश विश्वकर्मा, अमूल दुध संघाचे अध्यक्ष विपुलभाई पटेल, एनडीडीबी अध्यक्ष मीनेश शाह, गुजरात विधानसभा अध्यक्ष शंकर चौधरी, सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री दीपक चौरासिया राष्ट्रीय प्रकोष्ट प्रमुख देवेंद्र शर्मा आदी पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

दोन दिवासीय परिषदेचा प्रारंभ पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाला. परिषदेच्या पहिल्या सत्रात गुजरात विधानसभा अध्यक्ष शंकर चौधरी यांनी यशोगाथाच्या माध्यमातून प्रत्यक्ष कार्य करताना आलेले अनुभव मांडले, तर दुसऱ्या सत्रात दुधाची उत्पादकता आणि त्याची गुणवत्ता वाढीसाठी कोणती उपाययोजना करता येणे शक्य आहे, यावर व्यापक प्रमाणात चर्चा करण्यात आली. तसेच तिसऱ्या सत्रात आनंद कृषी विश्व विद्यालयाचे कुलपती कटारिया यांनी स्वदेशी गायी तर त्यानंतर गोपाल यांनी कृषि क्षेत्रातील दुग्ध व्यवसाय याविषयी भाष्य केले.

आजवरच्या अमूल उद्योग समुहाच्या यशस्वी वाटचालीची माहिती प्रबंध निदेशक जयेन मेहता यांनी सांगितली. तसेच या क्षेत्रात काम करताना अमूल समूह हा शेतकऱ्यांच्या आणि दूध व्यवसायात कशा प्रकारे सहाय्यभूत होऊ शकेल याबाबत सविस्तर विवेचन केले. तसेच या विषयासंबंधी उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. अधिवेशनाच्या समारोप सत्रात सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पांचपोर यांनी सहकाराच्या माध्यमातून व्यवसायामध्ये कशाप्रकारे वाढ करता येईल याबाबत सविस्तर विवेचन केले.

अधिवेशनासाठी देशाच्या विविध राज्यातून दूध उत्पादक व्यावसायिक सहकार भारतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच दूध व्यवसायाच्या क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत असणाऱ्या गायित्री बेन, मित्तल बेन, मिना बेन आणि या क्षेत्रातील उद्योजक महिलांनी यशस्वी वाटचालीचे अनुभव सांगितले.

दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनात एकूणच दूध उत्पादन, त्याची गुणवत्ता, उपपदार्थ निर्मिती बाजारपेठेची मागणी अशा विविध बाबींवर विचार विनिमय करण्यात आला.

# सहकार भारती नागपूर महानगर बैठकीत विविध विषयांवर चर्चा

**नागपूर –** सहकार भारती नागपुर महानगराची बैठक नुकतीच झाली. त्यामध्ये विविध विषयांवर व्यापक चर्चा करण्यात आली. महानगर अध्यक्ष घनशाम कुकरेजा अध्यक्षस्थानी होते. बैठकीला प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, महामंत्री किरण रोकडे, नीलिमा बावणे, सारिका पेंडसे, संजय रोकडे, मनोज पांडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

मुंबईतील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे झालेल्या सहकार भारती प्रदेश कार्यकारिणी बैठकीची माहिती राहुल कोडमलवर यांनी सांगितली तर सहकार भारती ऑनलाइन सदस्यता अभियानाची माहिती पांडे यांनी सांगितली. संगीता ठाकरे यांनी सहकार भारती दक्षिण भागाची कार्यकारिणी जाहीर



केली. बैठकीचे सूत्र संचालन रोकडे यांनी तर आभार कविता खापरे यांनी मानले.

# सहकार विभागाची अर्धन्यायिक निर्णय प्रक्रिया आणखी जलद - मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई** – राज्यातील सहकाराशी निगडित नागरिकांच्या सोयीसाठी ई-क्युजे प्रणालीचे मंत्रिमंडळ बैठकी दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. सहकार विभागाने विकसित केलेल्या या प्रणालीमुळे जनतेला जलद तसेच पारदर्शक पद्धतीने सहकार विभागाची अर्धन्यायिक निर्णय प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

इ-क्युजे प्रणालीविषयी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'महाराष्ट्र राज्य सहकारी चळवळीमध्ये देशात अग्रेसर असून राज्यात सुमारे २.२५ लाख सहकारी संस्था आहेत. या संस्थांचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार निबंधकामार्फत करण्यात येते. नागरिकांच्या सोयीसाठी शासनाच्या इ-गव्हर्नन्स धोरणाअंतर्गत इ-क्युजे प्रणाली विकसित करण्यात आली आहे. इ-क्युजे अंतर्गत पारदर्शक पद्धतीने कागदविरहित पुनर्विचार व अपील प्रक्रिया प्रणाली विकसित करण्यात आली आहे. यामुळे जनतेला सर्व सेवासुविधा घरबसल्या ऑनलाईन पद्धतीने मिळणार आहे. नागरिकांच्या, पक्षकारांच्या तसेच अधिकाऱ्यांच्या वेळेची बचतही होणार आहे.

इ-क्युजे प्रणालीच्या लोकार्पण प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील आदींसह विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे उपस्थित होते.

**※ इ-क्युजे अंतर्गत ऑनलाइन सुविधा –**

या प्रणालीमध्ये वकील/व्यक्ती/संस्थांची ऑनलाईन नोंदणी, सर्व पक्षकारांची ऑनलाईन नोंदणी, ऑनलाईन पद्धतीने प्रकरण दाखल करणे, दाखल प्रकरणांची ऑनलाईन छाननी, त्रुटी पूर्ततेसाठी ऑनलाईन सुविधा, दाखल प्रकरणांच्या सुनावणीच्या तारखा/त्यामधील बदल पक्षकारांना नोटिसा इ-मेलद्वारे बजावण्यात येणार आहेत. सुनावणीच्या तारखा व वेळा तसेच बोर्ड पक्षकारांना ऑनलाईन पाहता येणार, सर्व पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेता येणार व त्यांना ऑनलाईन रोजनामा उपलब्ध होणार आहे.

सर्व पक्षकारांना ऑनलाईन अर्धन्यायिक निर्णय (इ-मेलद्वारे) कळविण्यात येणार असून त्यामध्ये अन्य सेवांचा समावेश आहे. या प्रणालीअंतर्गत पहिल्या टप्प्यात महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट ॲक्ट १९६३ मधील मानीव अभिहस्तांतरण महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या विविध कलमाअंतर्गत अर्ज, अपील व पुनरीक्षण अर्ज तसेच महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ अंतर्गत अवैध सावकारीविरुद्ध तक्रार अर्ज या सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या प्रणालीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये व्हीसीद्वारे ऑनलाईन सुनावणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच नोटीस बजावण्यासाठी इ-टपाल सेवेचा अवलंब केला जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितली.

**सन २०२२-२३ मध्ये सहकार भारती आणि गृहनिर्माण प्रकोष्ठ, पतसंस्था प्रकोष्ठ यांच्या माध्यमातून तत्कालीन सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांना अनेक मागण्यांचे निवेदन सादर केले होते. त्यापैकी अर्धन्यायिक निर्णय प्रकिया, कन्व्हेयन्स प्रक्रिया, नोंदणी इ. ऑनलाइन पद्धतीने व्हावे ही मागणी केली होती. सहकार भारतीच्या या मागणीस यश आले असून मुख्यमंत्री फडणवीस यांनी उद्घाटन केले.**

## सहकारी संस्थामध्ये प्लास्टिकचा वापर बंद करण्यात यावा - मागणी

**सांगली** – सहकारी संस्थामध्ये आयोजित करण्यात येणार्या बैठका, कार्यक्रम, तसेच रोजच्या वापरात प्लास्टिकचा वापर बंद करण्यात यावा आणि याबाबत जागरूकता तयार करण्यात यावी अशी मागणी सहकार भारती आणि पर्यावरण संरक्षण गतिविधी यांच्या वतीने जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्याकडे निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, यंदा आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने प्लास्टिकमुक्त सहकार अथवा भूमीभक्त सहकार हे अभियान सुरू करण्यात यावे, यासाठी विभागाने पुढाकार घ्यावा विविध बैठकांमध्ये प्लास्टिकचा वापर करण्यात येऊ नये तर पर्यावरण पूरक साधनाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी सहकार भारतीचे संघटन प्रमुख संजय परमणे, तसेच डॉ. मनोज पाटील, श्रेयस सबनीस उपस्थित होते.

## आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपयोगाबाबत एक विशेष चर्चासत्र संपन्न

इचलकरंजी – कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या सहकार्याने अंब्रेला ऑर्गनायझेशन व आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपयोगाबाबत चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. बँकेचे अध्यक्ष स्वप्निल आवाडे, राज्य अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनच्या उपाध्यक्षा वैशाली आवाडे व नॅशनल अर्बन को-ऑपरेटिव्ह फेडरेशन अँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रभात चतुर्वेदी हे उपस्थित होते.




सहकार क्षेत्रातील बदलत्या घडामोडी, नवनवीन शासकीय योजना, सहकारी बँकांच्या भविष्यातील वाटचाली संदर्भातील विषयांवर वैशाली आवाडे यांनी मार्गदर्शन केले. सहकार क्षेत्रातील शाश्वत आर्थिक विकास, कार्यक्षम सेवा, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, अंब्रेला ऑर्गनायझेशनचे लाभ आणि पारदर्शक व्यवस्थापन या मुद्द्यांवर चर्चा झाली.

बँकेचे उपाध्यक्ष संजयकुमार अनिगोळ संचालक मंडळ, बँकेचे व्यवस्थापक दीपक पाटील किरण पाटील विविध बँकांचे पदाधिकारी संचालक कर्मचारी सहभागी झाले होते.

## लोकमान्य मल्टिपर्पज सोसायटीची विद्या धन ठेव योजना जाहीर

**पुणे** – लोकमान्य मल्टिपर्पज सोसायटीच्या वतीने नागरिकांसाठी विद्या धन ठेव योजना जाहीर करण्यात आली असून यासाठी गुंतवणुकीवर १०.५० टक्के इतका व्याज दर देण्यात येणारा आहे. ही योजना शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी विशेष ठेव योजना असणार आहेत. या योजनेचा कालावधी १८ महिन्यांचा असून या गुंतवणूक योजनेसाठी जेष्ठ नागरिकाना ०.५० टक्के इतका जादा व्याज दर देण्यात येणार आहे. योजनेत किमान १० हजार रुपयांची गुंतवणूक करणे अपेक्षित आहे.

गुंतवणूकदार घरबसल्या लोकमान्य डिजिटल अपच्या माध्यमातून योजनेत गुंतवणूक करू शकतात लोकमान्य सोसायटीच्या कोणत्याही शाखेत संपर्क साधून ग्राहक, सभासद, गुंतवणूकदार योजनेचा लाभ घेऊ शकणार आहेत, अशी माहिती सोसायटीच्या वतीने सांगण्यात आली.

# को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या प्रगतीसाठी संचालकांची भूमिका महत्त्वाची

को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या संचालकांनी संस्थेचा व्यवसाय वाढवण्यासाठी आणि संस्थेला प्रगतिपथावर नेण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी लागते. सहकार खात्याचे नियम आणि धोरणांचे पालन करणे हे सर्वात महत्त्वाचे आहे.

● **संचालकांची भूमिका आणि जबाबदाऱ्या –**

✲ **धोरण आणि उद्दिष्ट्ये निश्चित करणे :** संस्थेच्या सभासदांच्या हितासाठी आणि नियामकाच्या (सहकार विभाग) मार्गदर्शक तत्त्वांनुसार व्यवसायाच्या वाढीसाठी स्पष्ट धोरणे आणि उद्दिष्टे निश्चित करणे आणि त्यांचे काटेकोरपणे पालन करणे.

✲ **व्यवस्थापनाचे मार्गदर्शन आणि नियंत्रण :** दैनंदिन कामकाजासाठी योग्य व्यवस्थापन टीमची निवड करणे, त्यांच्या कामावर नियमित देखरेख ठेवणे ही संचालकांची जबाबदारी आहे. प्रशासन संस्थेच्या ध्येय-धोरणांनुसार आणि नियमांनुसार काम करत आहे की नाही यावर संचालक मंडळाने आणि पदाधिकाऱ्यांनी नियमित लक्ष ठेवावे.



व्यंकटेश कुळकर्णी
९४०३० ८०७५१

✲ **कायदेशीर आणि नियामक अनुपालन :** सहकार कायद्यांतर्गत असलेल्या सर्व नियमांचे आणि धोरणांचे योग्य पालन करणे आवश्यक आहे. यात वेळोवेळी होणारे बदल समजून घेणे आणि त्यानुसार संस्थेत बदल करणे महत्त्वाचे आहे.

✲ **जोखीम व्यवस्थापन :** संस्थेच्या व्यवसायात असलेल्या विविध प्रकारच्या धोक्यांचे (उदा. कर्जाची वसुली, बाजारातील बदल) मूल्यांकन करणे त्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

✲ **सभासदांशी संवाद :** संस्थेच्या सभासदांशी नियमित संवाद साधणे, त्यांच्या गरजा व अपेक्षा समजून घेणे आणि त्यानुसार सेवा पुरवणे महत्त्वाचे आहे.

✲ **पारदर्शकता आणि जबाबदारी :** संस्थेच्या कारभारात पूर्ण पारदर्शकता ठेवणे आणि घेतलेल्या निर्णयांसाठी जबाबदार राहणे आवश्यक आहे. नियमितपणे संस्थेचे ऑडिट करणे आणि ऑडिटमधील त्रुटींचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचवणे, त्या चुका पुन्हा होणार नाहीत याची दक्षता घेणे त्याचा अहवाल संचालक मंडळासमोर व सभासदांना सादर करणे महत्त्वाचे आहे.

✲ **दीर्घकालीन नियोजन :** संस्थेच्या भविष्याचा विचार करून दीर्घकालीन योजना तयार करणे, ज्यात व्यवसायाचा विस्तार, नवीन सेवा आणि तंत्रज्ञानाचा वापर यांचा समावेश असावा. व्यवसाय यशस्विता योजना (Business Succession Plan), व्हिजन (Vision) आणि मिशन स्टेटमेंट (Mission Statement) तयार करून त्याची अंमलबजावणी करणे.



● **व्यवसायवाढीसाठी काय करावे –**

✲ **सभासद व ग्राहक संख्या वाढवणे :** अधिकाधिक लोकांना संस्थेशी जोडण्यासाठी आकर्षक योजना आणि सेवा सुरू करणे. ग्रामीण भागात आणि असंघटित क्षेत्रात सभासद नोंदणीसाठी विशेष प्रयत्न करणे. ग्राहक मेळावे, सभासद शिक्षण आणि प्रशिक्षण मेळावे घेणे, सभासदांनी दिलेल्या सूचना व सल्ले ऐकून ते प्रत्यक्षात अंमलबजावणीत आणणे.

✲ **ठेवी वाढवणे :** वेगवेगळ्या प्रकारच्या आकर्षक ठेव योजना (उदा. मुदत ठेव, आवर्ती ठेव) सुरू करणे आणि त्यावर योग्य व्याजदर देणे.सभासदांना त्यांच्या गरजेनुसार बचत करण्यासाठी प्रोत्साहित करणे.

✲ **कर्ज वितरण :** सभासदांच्या गरजेनुसार आणि नियमकाच्या नियमांनुसार विविध प्रकारची कर्जे (उदा. कृषी कर्ज, व्यवसाय कर्ज, गृह कर्ज, वैयक्तिक कर्ज) वाटप करणे. कर्ज प्रक्रिया सुलभ आणि जलद करणे, सुटसुटीत दस्तऐवज वेळेत कर्ज पुरवठा करणे.

● **नवीन सेवा सुरू करणे :**

✲ **डिजिटल बँकिंग :** मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, UPI यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सभासदांना जलद आणि सोयीस्कर सेवा पुरवणे. यासाठी आवश्यक त्या बँकांसमवेत सेवा करार करणे, अल्प सेवाशुल्क घेऊन त्या सभासदांना व ग्राहकांना पुरवणे.

✲ **वित्तीय साक्षरता :** सभासदांसाठी वित्तीय साक्षरता कार्यक्रम आयोजित करणे, ज्यामुळे त्यांना योग्य आर्थिक नियोजन आणि गुंतवणुकीची माहिती मिळेल. सायबर सुरक्षेचे धोके सभासद व ग्राहकांना अवगत करून त्यांचे प्रबोधन करणे.

● **इतर वित्तीय सेवा :** विमा उत्पादने, म्युच्युअल फंड इत्यादी सेवा पुरवण्याचा विचार करणे (सहकार विभागाच्या परवानगीनुसार), ज्यामुळे उत्पन्नात वाढ होईल.

✲ **तंत्रज्ञानाचा वापर :** संस्थेच्या कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे,ज्यामुळे कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढेल आणि ग्राहक व सभासदांना चांगल्या सेवा देता येतील व सेवा खर्च कमी होईल.

✲ **प्रशिक्षण आणि विकास :** संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांसाठी नियमित प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, ज्यामुळे त्यांची कौशल्ये आणि ज्ञान अद्ययावत राहतील आणि त्यातून चांगली ग्राहक सेवा देता येईल व कामकाजात सुधारणा होतील.

✲ **सहभागी दृष्टिकोन :** संस्थेच्या निर्णयांमध्ये सभासदांचा सहभाग वाढवणे, त्यांच्या सूचना आणि मतांचा आदर करणे.

✲ **सामुदायिक विकास :** संस्थेच्या माध्यमातून सामाजिक आणि सामुदायिक विकास कार्यक्रमांमध्ये योगदान देणे, ज्यामुळे संस्थेची प्रतिमा समाजात चांगली राहील.

✲ **इतर संस्थांशी सहकार्य :** समान विचारधारा असलेल्या इतर सहकारी संस्थांशी आणि बँकांशी व्यावसायिक संबंध प्रस्थापित करणे, ज्यामुळे व्यवसायाच्या संधी वाढू शकतील.


✲ **सहकार खात्याच्या नियमांचे उल्लंघन –** नियमकाने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे आणि नियमांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेणे. विशेषत सीआरआर (CRR), एसएलआर (SLR) आणि

# देवगिरी बँकेच्या इंटरनेट बँकिंगला भारतीय रिझर्व्ह बँकेची मंजुरी

**छत्रपती संभाजी नगर** – देवगिरी नागरी सहकारी बँकेस भारतीय रिझर्व्ह बँकेने नुकतीच ग्राहकांसाठी इंटरनेट बँकिंग सेवा सुरू करण्यास मान्यता दिली आहे. बँक गत ३ वर्षापासून सलग भारतीय रिझर्व बँकेच्या आर्थिकदृष्ट्या सक्षम व सुव्यवस्थापित बँक या श्रेणीत असून इंटरनेट बँकिंग-सुविधा सुरू करण्यासाठी प्रस्ताव दिला होता. त्यास रिझर्व्ह बँकेने मान्यता दिली आहे, असे बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी सांगितले.

या निर्णयामुळे बँकेचे खातेधारकांना आता घरबसल्या ऑनलाइन बँकिंगच्या सुविधांचा लाभ घेता येणार आहे. यात खात्याची शिल्लक तपासणे, बँकेची दैनंदिन कामे, फंड ट्रान्सफर तसेच अनेक इतर सेवा समाविष्ट असतील. आरबीआयची मंजुरी मिळाल्यानंतर आवश्यक तांत्रिक चाचण्या व सुरक्षेची खातरजमा करून लवकरच सेवा ग्राहकांसाठी सुरू करण्यात येईल असे ते म्हणाले.

# त्रिभुवन सहकारी विद्यापीठ कार्यकारी मंडळावर सतीश मराठे




**नवी दिल्ली** – सहकार भारतीचे संस्थापक सदस्य, माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि आरबीआयचे संचालक सतीश मराठे यांची नुकतीच गुजरातमधील त्रिभुवन सहकारी विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळावर नामनिर्देशित सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. ही निवड तीन वर्षासाठी असणार आहे.

केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या वतीने ही निवड करण्यात आली आहे. नवनियुक्त मंडळात एकूण २५ सदस्य असणार आहेत. त्यामध्ये ४ सदस्य नामनिर्देशित असणार आहेत. देशातील सहकार क्षेत्राच्या सर्व स्वरुपाच्या संस्थासाठी प्रशिक्षण, शिक्षण, संशोधन पदवी, पदविका, अभ्यासक्रम असे अनेकविध उपक्रम विद्यापीठाच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहेत.

# को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या प्रगतीसाठी...

भांडवल पर्याप्तता (Capital Adequacy), एनपीए (NPA) नियंत्रित ठेवणे यांसारख्या नियमांचे काटेकोर पालन करावे.

❊ **गैरव्यवहार :** संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार किंवा भ्रष्टाचार होऊ नये याची दक्षता घ्यावी. त्यासाठी मजबूत अंतर्गत नियंत्रण प्रणाली (Internal Control System) तयार करावी. संस्थेच्या कामकाजात पारदर्शकता आणावी. सर्व मुद्द्यांवर संचालक मंडळात खुली चर्चा व विचारमंथन करावे. चांगल्या सूचनांचा आदर व अंमलबजावणी करावी.

❊ **अवास्तव व्याजदर** – ठेवी आणि कर्जांवर अवास्तव व्याजदर देणे टाळावे, ज्यामुळे संस्थेच्या आर्थिक स्थितीवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी मालमत्ता देयता व्यवस्थापन (Asset Liability Management) करावे.

❊ **राजकीय हस्तक्षेप** – संस्थेच्या कारभारात राजकीय आणि वैयक्तिक हस्तक्षेप टाळावा आणि व्यावसायिक दृष्टिकोन जपावा. वैयक्तिक हितापेक्षा संस्था हिताला महत्त्व द्यावे.

❊ **कर्ज वसुलीकडे दुर्लक्ष :** वाटप केलेल्या कर्जाची नियमितपणे वसुली करणे महत्त्वाचे आहे. कर्ज वसुलीसाठी प्रभावी नियंत्रण यंत्रणा तयार करावी आणि थकबाकीदारांवर योग्य व वेळीच कारवाई करावी. कर्ज खात्यावर देखरेख ठेवण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, वसुली कमिटीने त्यावर नियंत्रण ठेवावे. वेळोवेळी कर्ज पोर्टफोलिओचा आढावा घ्यावा.

❊ **सभासदांच्या व ग्राहकांच्या हिताकडे प्राधान्य :** केवळ व्यवसायवाढीवर लक्ष केंद्रित न करता सभासदांच्या व ग्राहकांच्या हिताला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

❊ **असुरक्षित गुंतवणूक :** संस्थेच्या निधीची असुरक्षित ठिकाणी गुंतवणूक करणे टाळावे. गुंतवणुकीसाठी सहकार खात्याने व नियामक मंडळाने घालून दिलेल्या सुरक्षित मार्गांचा अवलंब करावा. गुंतवणूक करताना एकाच संस्थेत मोठ्या रकमेची गुंतवणूक करू नये, पूर्ण अभ्यास करून गुंतवणूक करावी आणि वेळोवेळी त्याचा आढावा घ्यावा.

● **पारदर्शकतेचा अभाव :** संस्थेच्या आर्थिक आणि व्यावसायिक घडामोडींमध्ये अपारदर्शकता ठेवू नये. सर्व माहिती सभासदांना व संचालक मंडळाला वेळोवेळी पुरवणे आवश्यक आहे. सहकार खात्याच्या धोरणानुसार सहकार खाते आणि नियामक मंडळ वेळोवेळी क्रेडिट सोसायट्यांसाठी विविध धोरणे आणि नियम लागू करते. संचालकांनी या धोरणांची माहिती ठेवणे आणि त्याचे योग्य पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.

● **काही प्रमुख धोरणे :**

❊ **भांडवल पर्याप्तता :** संस्थेने तिच्या मालमत्तेच्या तुलनेत पुरेसे भांडवल राखणे आवश्यक आहे.

❊ **तरलता व्यवस्थापन :** संस्थेकडे दैनंदिन गरजांसाठी पुरेसा निधी असणे आवश्यक आहे (CRR आणि SLR चे पालन करणे). CASA (Current Account Savings Account), CD (Credit Deposit) Ratio वर नियंत्रण, NPA (Non-Performing Assets) वसुलीवर नियंत्रण.

❊ **कर्ज व्यवस्थापन :** कर्जाचे वर्गीकरण, तरतूद आणि वसुलीसाठी सहकार खात्याचे नियम पाळणे आवश्यक आहे.

❊ **गुंतवणूक धोरण :** संस्थेने तिच्या निधीची गुंतवणूक नियामक मंडळाने मान्यता दिलेल्या मार्गानेच करावी.

❊ **ग्राहक संरक्षण :** ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी सहकार खात्याने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे.

❊ **सायबर सुरक्षा :** डिजिटल बँकिंग सेवा पुरवत असल्यास सायबर सुरक्षेच्या मानकांचे पालन करणे. ग्राहक-सभासदांना जागृत करणे.

❊ **नो युवर कस्टमर** (KYC) **आणि अँटी-मनी लाँडरिंग** (AML) **मार्गदर्शक तत्त्वे :** या नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.


संचालकांनी जागरूक राहून, योग्य नियोजन करून आणि सहकार खात्याच्या नियमांनुसार कामकाज करून त्यांच्या को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचा व्यवसाय यशस्वीपणे वाढवता येईल, सभासदांच्या हिताचे जतन करता येईल. मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून, संस्थेला अधिक मजबूत व यशस्वी बनवू शकता.

**– व्यंकटेश कुळकर्णी.**
**प्रशिक्षण केंद्र प्रमुख**
**सहकार भारती प्रशिक्षण सहकारी संस्था मर्यादित कराड.**

*****

# डिजिटल युगात समाविष्ट होण्यासाठी सहकारी बँकांनी नवीन सॉफ्टवेअर मॉडेलचा विचार करणे हितकारक !

शहर सहकारी बँका (UCBs) ही भारताच्या वित्तीय व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत. या बँका छोट्या व्यावसायिक, नोकरदार, निवृत्त व्यक्ती आणि स्वयंरोजगार करणाऱ्या ग्राहकांना सहज कर्ज देतात. मात्र, जेव्हा आपण सहकारी बँकेकडे नव्या डिजिटल युगातील बँका म्हणून पाहतो आणि त्यांच्या कर्ज प्रक्रिया आणि तंत्रज्ञानाचा अवलंब बघतो, तेव्हा लक्षात येते की बहुतेक सहकारी बँका अजूनही डिजिटल व्यापाराच्या बाबतीत खूप मागे आहेत. याबाबतच्या अनेक कारणांपैकी एक महत्वाचे कारण म्हणजे, बाजारात उपलब्ध असलेली सॉफ्टवेअर सेवा (SaaS) आणि त्यांचे सॉफ्टवेअर होस्टिंग मॉडेल या बँकांच्या गरजांना धरून केलेले नाहीत त्यामुळे ते बँकांच्या मूलभूत व्यवहारासाठी अनुरूपही नाहीत.




**अजित भाले**

**८००७७ ५५४५५**


**लेखांक ५**

बाजारात प्रचलित सॉफ्टवेअर खरेदीविक्रीच्या प्रक्रिया या डिजिटली सजग अशा व्यवसायांना पूरक अशाच असतात किंबहुना आहेत. पण सहकारी बँकांसारख्या तंत्रज्ञानाकडे दुर्लक्षित व्यवसायांसाठी मात्र त्या अडचणीच्या ठरतात. असे असले तर मग त्यासाठी योग्य उपाय काय असू शकतो? त्याचा हा ऊहापोह.

**१. सध्याची : क्लाउड होस्टिंग किंवा ऑन-प्रिमायस होस्टिंग – दोन्ही अपुरे**

आजच्या काळात बऱ्याच सॉफ्टवेअर सेवा कंपन्या त्यांचे डिजिटल कर्ज सोल्यूशन्स पब्लिक क्लाउडवर SaaS स्वरूपात देतात. मोठ्या बँकांसाठी हे योग्य असले, तरी सहकारी बँकांना मात्र ते धोकादायक वाटते. ते का?

डेटावर ताबा नसतो, नसल्याचा भास होतो डेटा कुठे आहे, कोण पाहतो, कोण बदल करू शकतो याबाबत स्पष्टता नसते. ती स्पष्टता आणणे ही बँकाच्या डेटा सांभाळण्याबाबतच्या पॉलिसी आणि त्या वापरात आणण्यासाठीच्या सूचना यावर अवलंबून असते.

इंटरनेट आणि IT ची कमतरता अनेक बँकांकडे विश्वासार्ह नेटवर्क आणि टेक्निकल स्टाफ नसतो हे महत्वाचे करत आहे.

सायबर सुरक्षेची चिंता इंटरनेटवर चालणारी प्रणाली म्हणजे संभाव्य हॅकिंगचा धोका. हा धोका खरोखर महत्वाचा आहे आणि या सायबर सिक्युरिटीचे बँकेंतर्गत माहितगार असावे लागतात.



दुसरीकडे, ऑन-प्रिमायस (बँकेच्या ऑफिसमध्ये सॉफ्टवेअर चालवणे) हा पर्याय बँकांसाठी तांत्रिकदृष्ट्या कठीण आहे. सर्व अपग्रेड्स, बॅकअप, आणि सुरक्षा बँकेने स्वतः पाहायची असते.

**२. सॉफ्टवेअर चे दर आणि त्याची दररचना : सहकारी बँकांच्या आर्थिक वास्तवाशी विसंगत आहेत.**

बहतेक SaaS कंपन्या सॉफ्टवेअरचे दर प्रत्येक वापरकर्त्यानुसार (per user) आकारतात. पण UCBs मध्ये एकाच व्यक्तीकडे अनेकविध जबाबदाऱ्या असतात– त्यामुळे अशा दररचनेत मिळालेले सॉफ्टवेअर हे पूर्ण जोमाने न वापरल्याने बँकांचा फारसा फायदा होत नाही आणि सॉफ्टवेअर विकत घेऊनही कर्मचारी जुन्याच कार्यपद्धतीला अवलंब करीत राहतात.

* थोडे कर्मचारी, पण जास्त जबाबदाऱ्या.
* कमी व्यवहार, पण जास्त खर्च.
* एकदाच दिला जाणारा मोठा सॉफ्टवेअर शुल्क (license fee) आणि त्यामधील RBI नियमानुसार लागणारे बदल बघणे हे बँक कर्मचाऱ्यांना क्लिष्ट वाटते.

खरे म्हणजे, सहकारी बँकेला हवी आहे उत्पन्न आधारित, वाढीसाठी पोषक अशी सॉफ्टवेअरची दररचना – म्हणजे बँकांचे दैनंदिन व्यवहार किंवा कर्ज वाटपावर आधारित मदत करणारी सॉफ्टवेअर व्यवस्था.

उदाहरणादाखल, सॉफ्टवेअर विकत घेण्याचे नवे निकष कसे असावेत, तर असे सॉफ्टवेअर मॉडेल जे

* एका कर्जाच्या छाननी साठी ठराविक फी आकारू शकते.
* प्रत्येक KYC / क्रेडिट बुरो चेकसाठी, सगळ्या सरकारी माहितीच्या स्तोत्रं वापणारी व्यवस्था यात असते
* आणि वापरावर आधारित दर आकारणी
* अशा प्रकारच्या सॉफ्टवेअर मॉडेलचा आग्रह सहकारी बँकांनी धरला पाहिजे.

**३. नियमांचे पालन** (Compliance) **: जड आणि जोखमीचे काम**

आपण उदाहरणादाखल, डिजिटल कर्ज व्यवस्था बघुयात. अशा कर्ज प्रक्रियेत अनेक कायदेशीर बाबी येणे अपेक्षित आहे.

* KYC, CKYC आणि UIDAI ची पूर्तता.
* क्रेडिट बुरो रिपोर्टिंग.
* डिजिटल व्यवहारांचे सुरक्षा नियम.
* RBI च्या कर्ज प्रक्रियेतील आणि क्रेडिट रिस्क ॲनालिसिस संबंधातील मार्गदर्शक सूचना.

मोठ्या बँकांकडे यासाठी स्वतंत्र compliance टीम आणि सशक्त सॉफ्टवेअरचा वापर असतो. पण UCBs हे काम बहुतेकदा स्वतःच शिकत आणि कागदोपत्री करत असतात, त्यामुळे त्यांच्या मूलभूत चुका होण्याची शक्यता असते आणि त्यातूनच कॉम्प्लियन्सच्या त्रुटी वाढून बँकांच्या RBI रेटिंग घसरण्याची जोखीम वाढते.

**४. पण बँकांनी स्थानिक होस्टिंग (लोकल डेटा सेंटर) करावे म्हणजे या जोखमी जातात हेही योग्य उत्तर नाही.**

पुढील पानावर...

# विश्वेश्वर सहकारी बँकेला 'शेड्यूल्ड' बँकेचा दर्जा


**पुणे** – येथील दि विश्वेश्वर सहकारी बँकेला भारतीय रिझर्व्ह बँकेने शेड्युल बँकेचा दर्जा नुकताच दिला आहे. बँकेच्या आजवरच्या वाटचालीतील हे एक महत्त्वाचे यश आहे. या निर्णयामुळे बँकेला अधिक सोयीस्कर बँकिंग सेवा आणि सुविधा उपलब्ध होतील. तसेच सहकारी बँकिंग क्षेत्रालाही चालना मिळेले.

आरबीआय कायदा, १९३४ या कायद्याच्या शेड्यूलमध्ये टियर ३ आणि टियर ४ नागरी सहकारी बँकांना समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

बँकेची स्थापना सन १९७२ मध्ये झाली. दि विश्वेश्वर सहकारी बँक ही नागरी सहकारी बँक आहे. बँकेच्या वतीने ग्राहकांना सोयीस्कर बँकिंग सेवा पुरवली जात आहे. बँकेच्या महाराष्ट्रात आणि कर्नाटकमध्ये २८ शाखा कार्यरत आहेत.

# विकास सहकारी सोसायट्या सक्षम करण्याची प्रक्रिया वेगाने सुरु

**मुंबई** – देशभरातील विकास सहकारी सोसायटी अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने केंद्रीय सहकार मंत्रालयाने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयाचा दृश्य परिणाम आता दिसू लागला आहे. त्याचा एक भाग म्हणून महाराष्ट्रातील जवळपास १०,९१४ विकास सोसायटीकडून याबाबतची प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.



या विषयाबाबतची नुकतीच एक बैठक मुंबईत झाली. यावेळी केंद्रीय सहकार सचिव डॉ. आशिशकुमार भूटाणी उपस्थित होते. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी त्या त्या राज्याच्या मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली एक समिती तयार करण्यात आली आहे. केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या कार्यक्रमानुसार सोसायट्यांना अन्य पूरक व्यवसाय करण्याची मुभा मिळाली आहे. राज्यात सध्या २१ हजार सोसायट्या कार्यरत असून त्यातील सुमारे १२ हजार सोसायट्यांना येत्या ५ वर्षांत सक्षम करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

पीक कर्ज वाटप हे काम मुख्यत्वे सोसायट्यांच्या माध्यमातून करण्यात येत होते पण आता बदलत्या काळात गरजेनुसार अन्य व्यवसाय करता येणार आहेत. जन औषधी केंद्र, खत विक्री केंद्र, आदी व्यवसाय करता येणार आहेत. तसेच सोसायट्यांचे संगणकीकरण यावरदेखील भर देण्यात येत आहे. आजवर राज्यातील ९२ टक्के सोसायट्यांचे संगणकीकरण पूर्ण करण्यात आले आहे. शेतमाल बाजारपेठ तयार व्हावी यासाठी नॅशनल को-ऑप. एक्स्पोर्ट सोसायटी स्थापन केली आहे. राज्यातील ९८० सोसायट्यांनी त्याचे सदस्यत्व घेतले असल्याची माहिती यावेळी सांगण्यात आली.

# डिजिटल युगात समाविष्ट होण्यासाठी सहकारी बँकांनी....

काही सहकारी बँका राज्याच्या IT मंडळांच्या माध्यमातून स्थानिक डाटा सेंटरमध्ये सॉफ्टवेअर चालवतात. पण त्यातही अनेक त्रुटी:

✲ RBI च्या सूचना वेळीच सॉफ्टवेअरमध्ये न आल्याने सुरक्षा आणि अपडेट्स असमान आणि कार्यशैलीविषयी संदिग्धता निर्माण करणारे ठरते.

✲ प्रत्येक बँकेचा वेगळा खर्च आणि RBI नियमानुसार तो सेटअप चालवणे, लहान बँकेसाठी अशक्यप्राय ठरत चालले आहे.

✲ पायाभूत सुविधांचा दर्जा कमी आणि बँकांच्या ग्राहकांसाठी ते हितकारक ठरत नाही.

म्हणूनच हे डेटा सेंटर मॉडेल हा सद्यकालीन मार्ग काही दीर्घकालीन उपाय नाही. किंबहुना नसावा.

**५. मग योग्य उपाय आहे काय तर तो आहे सहकारी क्षेत्रासाठी सामायिक डिजिटल प्लॅटफॉर्म ही संकल्पना**

एक नवीन उपाय म्हणजे RBI किंवा सहकार मंत्रालय मान्यता देईल असा सामायिक डिजिटल प्लॅटफॉर्म, जो अनेक (कदाचित सर्व) सहकारी बँकांसाठी एकत्र काम करेल, पण त्याच वेळी RBI नियमानुसार प्रत्येक बँकेचा डेटा वेगळा आणि सुरक्षित ठेवेल.

● **हे मॉडेल कसे असेल?**

✲ **विश्वासार्ह आणि नियंत्रित होस्टिंग :**

कोणत्याही पब्लिक क्लाउडशिवाय, डेटा भारतातच ठेवला जाईल. प्रत्येक बँकेला सुरक्षित लॉगिनद्वारे प्रवेश दिला जाईल.

✲ **उत्पन्नावर आधारित दररचना :**

उदाहरणादाखल, प्रत्येक कर्ज योग्यरित्या छाननी करून दिलं गेलं की सॉफ्टवेअर वापराचे पैसे द्या नाहीतर नाही. यामुळे बँकेचा कॅपिटल इन्व्हेस्टमेंटची गरज कमी होऊन न वापरण्याजोगे सॉफ्टवेअर विकत घेणं आणि ते पडून राहण्याचा धोका कमी होऊन खर्च नियंत्रणात राहतो.

✲ **मध्यवर्ती Compliance सेवा:**

CKYC, UIDAI, PAN, बुरो इंटिग्रेशन हे सर्व प्लॅटफॉर्मद्वारे आधीच तयार असेल, बँकेला वेगवेगळ्या एजन्सींशी झगडावं लागणार नाही.

✲ **स्थानिक सहाय्यक नेटवर्क :**

प्रशिक्षण, हेल्पडेस्क आणि ऑनबोर्डिंग स्थानिक भाषेत आणि सहकारी क्षेत्राशी परिचित तज्ज्ञांकडून दिलं जाईल.

**६. कोणाला फायदा? कदाचित सगळ्या महत्वाच्या भागीदारांना**

✲ बँकांना – सुरक्षित, सोपा आणि परवडणारा डिजिटल कर्ज प्लॅटफॉर्म

✲ ग्राहकांना – वेगवान आणि पारदर्शक सेवा

✲ नियामकांना – एकसंध, सुरक्षित आणि ऑडिटयोग्य IT सेटअप

सॉफ्टवेअर कंपन्यांना विशिष्ट गटासाठी विश्वासार्ह सेवा पुरवता येते. त्यांचा विश्वास जिंकून दीर्घ सेवा मिळविण्याची संधी निर्माण होते आणि RBI च्या नियमांचे पालन करण्याची सुकरता यातून निर्माण होते.

● **निष्कर्ष काय :** सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी तंत्रज्ञान वापर आता अनिवार्य आहे. मात्र या क्षेत्रातील सध्याचे सॉफ्टवेअर मॉडेल बदलण्याची अत्यंत गरज असून जबाबदार सॉफ्टवेअर मॉडेल अवलंबायची आवश्यकता आहे.

सहकारी बँका मागे राहिल्या आहेत कारण त्यांच्यासाठी योग्य टेक्नॉलॉजीचा पर्याय आजवर त्यांना सादरच झालेला नाही. पब्लिक क्लाउड किंवा एकटे होस्टिंग ही दोन्ही टोकाची मॉडेल्स या बँकांच्या दैनंदिन गरजांशी जुळत नाहीत. सहकारी बँकेसाठी बँकिंग ही परिपूर्ण सेवा सामायिक डिजिटल या RBI अधिकृत आणि सहकार मंत्रालय संलग्रित विश्वासार्ह संस्थेकडून झाल्यास बँकांची वाढ, कॉम्प्लियन्स आणि नवीन ग्राहक जोडण्याकडे कल वाढून सहकारी बँका भारतीय अर्थव्यवस्थेत एक सशक्त भागीदार बनू शकतो यात काही शंका नाही.

**– अजित भाले,**
**संस्थापक, मेट्टारेव सिस्टीम्स, पुणे**
Mettarev Systems ajit.bhalemettarev.com

✲✲✲✲✲




# सहकार कायद्यात कालानुरूप बदल करण्यासाठी समिती स्थापन करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सूतोवाच

**मुंबई –** सध्याच्या सहकार कायद्यात बदलत्या कालानुरूप बदल करण्याची आवश्यकता असून यासाठी समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे जाहीर केले आहे.

राज्य सहकारी बँकेच्या वतीने सहकाराचे सक्षमीकरण आणि राज्य शासनाचे धोरण या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. जेष्ठ नेते शरद पवार, केंद्रीय महामार्ग मंत्री नितिन गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, व्यासपीठावर होते. यावेळी बँकेच्या वार्षिक आर्थिक प्रगती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

सहकार क्षेत्राशी संबंधित प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम सहकार कायद्यातून झाले पाहिजे असे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यासाठी सहकार कायद्यात बदल करून प्रत्येक क्षेत्राशी निगडित असे मुद्दे समाविष्ट करावे लागणार आहेत. सहकारी बँकांनी नव्याने आधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेत बँकिंग क्षेत्रात आमूलाग्र बदल केले आहेत. कोअर बँकिंग प्रणालीसह आधुनिक तंत्रज्ञानयुक्त बँकिंग प्रणाली सहकारी बँकांनी स्वीकारली आहे. ग्राहकोपयोगी सर्व सेवा सहकारी बँकांच्या वतीने देण्यात येत आहे.

*** देशामध्ये सहकार चळवळीचे सक्षमीकरण** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रात प्रथमच स्वतंत्र सहकार मंत्रालय सुरू केले आहे असे नमूद करून ते म्हणाले, या मंत्रालयाच्या माध्यमातून देशामध्ये सहकार चळवळीचे सक्षमीकरण होत आहे. देशभरात सहकारी संस्थांचे सक्षमीकरण केंद्र सरकारच्या माध्यमातून करण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण अर्थकारणाला चालना मिळत आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने १० हजार गावामध्ये सहकारी संस्थांना प्रशिक्षण देऊन त्यांचे बिझिनेस मॉडेल बनविण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

*** सूतगिरणी सौर ऊर्जेवर** – सहकारी साखर कारखाने साखर उत्पादनाबरोबर उपपदार्थ तयार करीत आहेत असे नमूद करून ते म्हणाले, यामुळे जागतिक स्पर्धेत साखर कारखाने टिकून आहेत. केंद्र सरकारने किमान आधारभूत किंमत इथेनॉल धोरण यामध्ये सतत बदल केले आहेत. शेतकऱ्यांचे कारखाने हे शेतकऱ्यांकडे राहिले पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. त्यामुळे साखर कारखान्यांनी उपपदार्थांच्या निर्मितीवर अधिक भर देण्याची गरज आहे. सूतगिरण्या अडचणीत असल्या तरी त्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्याचा एक भाग म्हणजे सूतगिरण्या सौरउर्जेवर नेण्यात येत आहे. त्यामुळे विजेची अडचण दूर होण्यास मदत होणार आहे, असे ते म्हणाले.

सहकार क्षेत्राच्या माध्यमातून प्रक्रिया उद्योगांना मदत करण्यात यावी असे सांगून ते म्हणाले, एकूण सहकारी संस्थांमध्ये ५० टक्के संस्था या गृहनिर्माण संस्था आहेत. सहकार कायद्यात बदल करून मागील काळात सहकारी गृह निर्माण संस्थासाठी स्वतंत्र विभाग ठेवण्यात आला. यामधून सहकारी गृहनिर्माण संस्थांची व्यवस्था उभारण्यात येत आहे. स्वयंपुनर्विकास करण्यासाठी नवीन योजना सहकारी संस्थांसाठी आणली आहे. त्यांना शासनाकडून सुमारे १७ प्रकारच्या सवलती देण्यात येत आहेत.

*** सहकारी संस्थांसाठी नेमके धोरण हवे** – सहकार क्षेत्रातील काही संस्थामध्ये वेगाने खासगीकरण होत असून ही चिंतेची बाब आहे. म्हणून राज्य शासनाने सहकारी संस्थांबाबतचे धोरण आणि कायदा बदलण्याची गरज आहे, असे जेष्ठ नेते पवार यांनी सांगितले. ते म्हणाले, देशातील सहकार क्षेत्रात महाराष्ट्र क्रमांक एकचे राज्य होते मात्र आता गुजरात आघाडीवर आहे. राज्यात आजारी जिल्हा बँका, सूतगिरण्या, सहकारी साखर कारखाने, यात वेगाने खासगीकरण होत आहे ही चिंतेची बाब आहे. जिल्हा बँका साखर कारखाने आणि सूतगिरण्या हे तीन महत्त्वाचे घटक आहेत. या संस्थांमध्ये राज्य शासनाचे भाग भांडवल आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत चित्र बदलत आहे. साखर कारखानदारी महाराष्ट्रातून देशात पोचली. काही वर्षांपूर्वी साखर कारखानदारीच्या काळात स्थिरता होती पण गेल्या काही वर्षांत खासगी कारखाने मोठ्या प्रमाणावर वाढले. पूर्वी ८० टक्के कारखाने सहकारी तर २० टक्के कारखाने खासगी होते. पण बदलत्या स्थितीत खासगी कारखान्यांची संख्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक झाली आहे, असे ते म्हणाले.

*** नवीन कायदा आणावा --** केंद्रीय मंत्री गडकरी यांनी सांगितले की, सध्या सहकार चळवळ केवळ महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, केरळ आणि अन्य काही राज्यामध्ये दिसून येत आहे. सहकार चळवळ देशभर रुजविण्यासाठी केंद्र सरकारने नवीन सहकार मंत्रालयाच्या माध्यमातून काम सुरू केले आहे. महाराष्ट्रात सध्या अस्तित्वात असलेला कंपनी कायदा सहकार क्षेत्रातील कायदा याचा सुवर्णमध्य साधून नवीन कायदा आणावा अशी सूचना त्यांनी केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले की, सहकार क्षेत्राची वाटचाल गतिमान होत असली तरी भविष्यातील अडचणी आणि आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी चळवळ अधिक सशक्त करण्याची गरज आहे. सहकार चळवळीच्या आजवरच्या इतिहासावर राज्य सहकारी बँकेने अहवाल तयार करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, भारताची वाटचाल महासत्ता होण्याच्या दृष्टीने सुरू असून यामध्ये सहकार क्षेत्राचा महत्त्वपूर्ण असा वाटा आहे. केंद्रात सहकार मंत्रालय स्थापन झाल्यावर सहकार क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सुधारणाचे वारे वाहू लागले. सुरूवातीला प्रशासक अनास्कर यांनी प्रास्ताविकात बँकेच्या वाटचालीची माहिती सांगितली. दिलीप दिघे यांनी आभार मानले.

# सहकाराची सर्वप्रथम मुहूर्तमेढ महाराष्ट्रात!

१२ मे १८७५ या दिवशी पुणे जिल्ह्यात 'सुपा' या गावी ऐन बाजाराच्या दिवशी शेतकऱ्यांनी स्थानिक सावकार व व्यापाऱ्यांना मारहाण केली. हा उठाव अचानक झाला असला तरी त्याला ब्रिटिशांच्या अन्याय्य धोरणांची पार्श्वभूमी होती. पुढे त्याचे लोण सातारा, सोलापूर व नाशिक येथे पसरत गेले. ब्रिटिशांनी सहकारी पतसंस्थेची कल्पना अमलात आणली. अशा या लढ्याचा उद्या शतकोत्तर सुवर्ण स्मृतिदिन.



विद्याधर अनास्कर
मो.नं. ९८५०९७४०७५

पूर्वीच्या काळी सावकार आणि व्यापारी हेच शेतकऱ्यांसाठी कर्जाचे प्रमुख स्रोत होते. हे स्रोत वैयक्तिक स्वरूपाचे असल्याने नैतिकतेशिवाय इतर कोणतीही बंधने त्यांच्यावर नव्हती. पैसा व नैतिकता यांचे विळ्या-भोपळ्याचे सख्य असल्याने अशा लोकांकडून नैतिकतेची अपेक्षा करणे व्यर्थ होते. कर्जासाठी संस्थात्मक स्रोत फारसे उपलब्ध नव्हते किंवा असल्यास अकार्यक्षम होते. या पार्श्वभूमीवर सावकारांची मक्तेदारी वाढल्यामुळे ते व्याजाची भरमसाट दराने आकारणी करत. व्याजाची आकारणी करण्याच्या पद्धतीमध्येदेखील फसवणूक करीत. समजा द.सा.द.शे. २० टक्के दराने १०० रुपये कर्जाऊ दिले तर कर्ज देताना व्याजाचे २० रुपये कापून घेत असत. म्हणजे प्रत्यक्षात ८० रुपये हातात पडत असल्याने व्याजाचा प्रत्यक्षातील दर द.सा.द.शे. २५ टक्के पडत असे. कर्ज देतानाही अत्यंत कडक अटी व शर्ती लादल्या जात असत. शेतकऱ्यांच्या जमिनी गहाण घेतल्या जात असत. शेतकऱ्यांकडे दुसरा पर्याय नसल्याने त्यांना असे अन्यायकारी कर्ज स्वीकारण्याशिवाय पर्याय नसे. एकदा का शेतकरी या कर्जाच्या विळख्यात अडकला तर त्याच्या कित्येक पिढ्या कर्ज फेडण्यातच संपत असत.

शेतकरी व सावकार याच्यामधील हा संघर्ष जुना असला तरी सावकारांविरुद्ध शेतकऱ्यांच्या क्रोधाचा अतिरेक होऊन त्याचे रूपांतर सावकारविरोधी उठावात होण्यासाठी निर्माण झालेल्या त्यावेळच्या परिस्थितीचा अभ्यास करणे गरजेचे वाटते. सन १८६० च्या दशकामध्ये ब्रिटनला लागणाऱ्या कच्च्या कापसाच्या आयातीपैकी तीन चतुर्थांश कापूस अमेरिकेतून आयात होत होता. सन १८६१ मध्ये जेव्हा अमेरिकेत यादवीचा भडका उडाला तेव्हा अमेरिकेतून येणारी आयात खूपच कमी झाली. त्या वेळी ब्रिटिश व्यापाऱ्यांनी भारतातून कापसाची आयात व खरेदी सुरू केली. त्यासाठी त्यांनी भारतीय व्यापाऱ्यांना आगाऊ रकमा देण्यास सुरुवात केली. कापसाची जादा गरज भागविण्यासाठी व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना कापूस उत्पादनावर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले. त्यासाठी शेतकऱ्यांनी सावकार व व्यापाऱ्यांकडून मोठी कर्जे घेतली. त्यासाठी स्वतःच्या जमिनी गहाण ठेवल्या. अनेक भारतीय शेतकऱ्यांनी खाद्य पिकांऐवजी कापूस पिकविण्यास प्राधान्य दिले. विदर्भातील जमीन व हवामान कापूस निर्मितीस पोषक असल्याने त्या भागातून कापसाची निर्यात जास्त होऊ लागली. शेतकऱ्यांच्या हाती चार पैसे खेळू लागले. परंतु दिनांक ९ एप्रिल १८६५ रोजी अमेरिकेतील यादवी युद्ध संपुष्टात आल्यानंतर कापसाच्या मागणीत मोठी घट झाली आणि सावकारांनी शेतकऱ्यांकडून जादा व्याजदराने पैसे वसूल करण्यास सुरुवात केली. अचानक बदललेल्या परिस्थितीमुळे शेतकरी कर्ज परतफेड करण्यात अयशस्वी झाले. सावकारांनी त्यांच्या जमिनी जप्त केल्या.

भारतीय शेती जागतिक अर्थव्यवस्थेत ओढली जात असताना, शेतीच्या घसरलेल्या किमती, प्रचंड कर आकारणी यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड हाल झाले. सावकारांविरुद्ध हिंसक निदर्शने सुरू झाली. त्याची दखल घेत ब्रिटिशांनी मर्यादा कायदा (लिमिटेशन ॲक्ट) मंजूर करीत शेतकऱ्यांनी दिलेल्या रोख्यांची वैधता तीन वर्षांची केली. त्यामुळे मुद्दल अधिक व्याज अशा एकत्रित रकमेवरील नवीन कर्जरोख्यांवर शेतकऱ्यांना स्वाक्षऱ्या करणे भाग पडले. यामुळे व्याजावर व्याज व सध्याच्या बँकिंगमधील 'नवे-जुने' या अनिष्ट प्रथेचा उगम येथेच झाला असे नमूद केल्यास वावगे होणार नाही.

सावकाराच्या व्याजाचा व कर्जाचा भरणा करण्यासाठी शेतकऱ्यांना कापणी झाल्यानंतर लगेचच आपले उत्पादन विकावे लागे. त्यामुळे त्यांना कमी किंमत मिळत असे. जे सावकार धान्य व्यापारी होते. ते धान्याच्या स्वरूपातच व्याज व कर्जाची परतफेड करण्याची अट घालत असत. त्या वेळी बाजारात धान्याची किंमत कमी असल्याने त्यांना जास्त धान्य मिळत असे. या व अशा अनेक प्रकारे सावकार गरीब शेतकऱ्यांचा छळ करीत असत. त्या वेळी सावकारांना कर्जावर लावायच्या व्याजदरावर कोणतीही मर्यादा नव्हती. सरकारचेही सावकारी व्यवसायांवर कोणतेही नियंत्रण नव्हते. आणि हीच परिस्थिती दख्खनच्या उठावास कारणीभूत ठरली.

१८७५ च्या सुरुवातीस शेतकऱ्यांनी सावकारांवर सामाजिक बहिष्कार टाकण्यास सुरुवात केली. त्यांच्याकडे कोणी कामाला जायला तयार नसे. तसेच १२ बलुतेदारांनीही सावकारांवर सामाजिक बहिष्कार टाकला. आणि दिनांक १२ मे १८७५ चा दिवस उजाडला. त्या दिवशी बुधवार होता. पुणे-नगर रस्त्यावरील 'सुपा' गावच्या बाजाराचा दिवस, त्या काळी सावकार व सावकारी व्यवसाय करणारे व्यापारीदेखील बाजाराला येत असत. १८५४ मध्ये पुणे व अहमदनगर जिल्ह्यातील सुमारे ४००१ एकर जमीन सावकारांकडे गहाण होती. सन १८७४ पर्यंत ती १००७५ एकरपर्यंत गेली होती. त्यामुळे बाजाराला आलेला प्रत्येक शेतकरी सावकारांकडून नागवला गेला होता. एका सावकाराबरोबर वादाचे निमित्त झाले आणि शेतकऱ्यांनी बाजाराला आलेल्या स्थानिक सावकार व व्यापाऱ्यांना भर बाजारात मारहाण केली, त्यांच्या घरांवर हल्ले केले. त्यांच्याकडील हिशोबाची पुस्तके, शेतकऱ्यांचे कर्जरोखे इ. जाळण्यात आले. शेतकऱ्यांचा हा उठाव अचानक होता, पूर्वनियोजित नव्हता. त्यांचे नेतृत्व सामुदायिक होते. पुणे व अहमदनगर शहरातील सुमारे ३० गावांमध्ये हे संघर्षाचे लोण पसरले. बघता बघता हा उठाव पुढे सातारा जिल्हा, सोलापूर जिल्हा व नाशिक येथे पसरला. हे सर्व जिल्हे ब्रिटिशांच्या मुंबई प्रांतातील दक्षिणेकडील होते.

नेमके त्याच वेळी भारतीय लढ्यातील पहिले सशस्त्र क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांनी रामोशी, धनगर समाजांतील तरुणांना एकत्र करून ब्रिटिश सरकारविरुद्ध सशस्त्र उठाव केला. पुणे, अहमदनगर, नाशिक टापूत पायी प्रवास करून त्यांनी शेतकऱ्यांची विपन्नावस्था पाहिली. याच वेळी शेतकऱ्यांनी सावकारांविरुद्ध त्याच भागात उठाव केल्याने काही काळ वासुदेव बळवंत फडके यांनी दख्खनच्या उठावाचे नेतृत्व केले. पुण्याजवळील लोणीकंद येथे त्यांनी बंडवाल्यांचे मुख्य कार्यालय स्थापन केले.

सरकारी खजिने, सावकार यांच्यावर त्यांनी सशस्त्र धाडी टाकल्या. शेतकऱ्यांच्या उठावाला वासुदेव फडके यांच्यामुळे पाठबळ मिळाले. परंतु १८७६-७८ मध्ये महाराष्ट्रात मोठे दुष्काळ पडले. त्यातच प्लेग, पटकीसारख्या साथीच्या रोगांची भर पडली. गुरे-ढोरे मेल्याने मोठा

पुढील पानावर...

# सहकार भारती अहिल्यानगर जिल्हा अध्यक्षपदी वासुदेव काळे

**अहिल्यानगर –** सहकार भारती या संस्थेच्या अहिल्यानगर जिल्हा अध्यक्षपदी श्रीरामपूर येथील वासुदेव काळे यांच्या निवडीची घोषणा सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश संघटन प्रमुख शरद जाधव यांनी केली.

संगमनेर येथील मालपाणी उद्योग समूहाचे संचालक गिरीश मालपाणी सहविभाग प्रमुख नानासाहेब वाघमोडे यांच्या उपस्थितीत जिल्हा कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. महामंत्री म्हणून संगमनेर योगेश उपासनी, संघटन प्रमुख म्हणून अजय नान्नोर यांची निवड करण्यात आली.

**नवीन कार्यकारिणी जाहीर**

प्रमुख अतिथी मालपाणी यांनी सहकार क्षेत्राकडून असलेल्या समाजाच्या अपेक्षा व सहकार भारती, सामाजिक संघटना म्हणून करत असलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. प्रदेश संघटन प्रमुख, जाधव यांनी सांगितले की, सहकार भारतीमुळे सहकार क्षेत्रातील विविध प्रश्न सोडवले गेले असून निस्वाःर्थपणे सामाजिक दायित्व निभावणारी ही संघटना असल्याचे सांगितले.

**जिल्हा कार्यकरिणी पुढीलप्रमाणे –** सह संघटन प्रमुख – महेंद्र खडके, महिला प्रमुख – योगिता शेलार, सह महिला प्रमुख – देवयानी जोशी उपाध्यक्ष – डॉ. पराग सराफ राजेंद्र वाबळे

कोषाध्यक्ष – दिगंबर कुलकर्णी, सचिव – डॉ. नितीन चासकर, किशोर कुलकर्णी, प्रशिक्षण प्रमुख – ज्ञानेश्वर गायकवाड, संपर्क प्रमुख – सोमनाथ लोखंडे, कार्यालय प्रमुख – अनिल कुलकर्णी, प्रसिद्धी प्रमुख – महेश देशपांडे, सोशल मीडिया प्रमुख – योगेश कडस्कर.

**विविध प्रकोष्ट प्रमुख पुढीलप्रमाणे –** बँक – प्रकाश कलंत्री, पतसंस्था – डॉ. स्वाधिन गाडेकर, पतसंस्था सह – रविंद्र खटोड, साखर कारखाना – अशोक ताके, कृषि उत्पन्न समिती – अभिषेक खंडागळे, विविध विकास सेवा सोसायटी – भाऊसाहेब पुजारी, पगारदार पतसंस्था – सुभाष काळे, हाऊसिंग सोसायटी – सुजाता मालपाठक, बचतगट – विद्या क्षिरसागर, दुध संघ – विराज भोसले, लेखापरिक्षण – सुरेश डौले, विधी – राजेंद्र खरे

खादी ग्रामोदय – प्रेमचंद कुंकुलोळ, अभिनव सेवा – अभिजीत कुलकर्णी, मल्टिस्टेट – प्रविण आप्रे

**कार्यकारिणी सदस्य –** सुनिल बोलके, अरविंद शहाणे, निशा निर्मळ, बापूसाहेब टाक, विशाल नावंदर, वैभव शहा, राजेश लाहोटी, डॉ. मोहसिन तांबोळी, अविनाश सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली. प्रत्येकास मोगऱ्याचे रोप व सहकार उपरणे देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन देवयानी जोशी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. पराग सराफ, प्रकाश कलंत्री व विजय नागरी सहकारी पतसंस्थेच्या समूहाने योगदान दिले.

# पुणे जिल्हा मध्य. बँकेला वैकुंठभाई मेहता उत्कृष्ट सहकारी बँक पुरस्कार जाहीर

**पुणे –** सहकार क्षेत्रातील सहकारी बँकिंग क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल पुणे विभागातून पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला वैकुंठभाई मेहता उत्कृष्ट जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक हा पुरस्कार जाहीर झाला आहे. दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन यांच्या वतीने हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुणे जिल्ह्यामध्ये कृषि कर्ज वितरणातही जिल्हा बँकेचा महत्वपूर्ण असा वाटा आहे.

आजवर विविध संस्थांच्या वतीने आणि अनेकविध पुरस्कारांनी बँकेला सन्मानित करण्यात आले आहे. बँकेच्या वतीने शेतकरी आणि खातेदारांना अत्याधुनिक सुविधा आणि विविध उपक्रम करण्यात येतात, त्याचा खातेदारांना फायदा होतो आहे, अशी माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई यांनी सांगितली.

# सहकाराची सर्वप्रथम मुहूर्तमेढ महाराष्ट्रात!

हाहाकार पसरला.

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे त्या काळातील एक प्रगल्भ विचारवंत, समाजसुधारक व अर्थतज्ज्ञ होते. त्यांनी पुण्यामध्ये सन १८७० मध्ये स्थापन केलेल्या 'पुणे सार्वजनिक सभा' या संस्थेने शेतकऱ्यांच्या उठावाला पाठिंबा दिला. समाजात चिंतनशील व विवेकी चर्चा घडवून आणणे, सामाजिक सुधारणांची मांडणी व प्रसार करणे, ब्रिटिश सरकार व जनता यामध्ये मध्यस्थी करणे ही या संस्थेची प्रमुख कार्ये होती. पुणे सार्वजनिक सभेने शेतकऱ्यांच्या न्यायासाठी आवाज उठविला. सावकारी प्रथांवर कठोर टीका केली. त्यांनी सरकारकडील कर्जावरील व्याजदराला मर्यादा असावी व सावकारीवर कायद्याने नियंत्रण असावे अशी शिफारस करीत असतानाच शेतकऱ्यांना पर्यायी पतपुरवठा मिळावा यासाठी सहकारी पतपुरवठा चळवळीचा आग्रह धरला.

दख्खनच्या उठावानंतर लगेचच सहकारी पतसंस्थेच्या संकल्पनेचा प्रस्ताव सर विल्यम वेड्डरबर्न यांनी मांडला. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी पतसंस्थेच्या संकल्पनेचा प्रस्ताव सर विल्यम वेडरबर्न यांनी मांडला. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी त्यास पाठिंबा दिला. मुंबई व पुण्यामध्ये या चळवळीला मोठे समर्थन मिळाले. त्यामुळे सहकारी कृषी बँक स्थापन करण्यासाठी एक विधेयक मुंबई विधान परिषदेत मांडले गेले. परंतु प्रत्यक्षात त्यामध्ये प्रगती झाली नाही. ब्रिटिश सरकारमधील सचिवांचा (सेक्रेटरी ऑफ स्टेट) त्यास विरोध होता. परंतु या सहकार चळवळीच्या मूलभूत संकल्पना पुढे सन १८८३ व १८८४ मध्ये लागू करण्यात आलेल्या 'जमीन सुधारणा कायदा' आणि 'शेती कर्ज कायदा' मध्ये समाविष्ट करण्यात आल्या.

त्या वेळी मद्रास सरकार हे भारतातील पहिले असे सरकार होते की जे युरोपातील सहकार चळवळीच्या यशस्वी अंमलबजावणीच्या अहवालांमुळे प्रभावित झाले. त्याच वेळी युरोपियन देशांमध्ये कर्जबाजारीपणाच्या समस्येशी लढण्यासाठी सहकारी तत्त्वांचा वापर प्रभावी ठरला होता. भारतात हे तत्त्व आणण्याच्या शक्यतांचा अभ्यास करण्यासाठी मद्रास सरकारने सर फ्रेडरिक निकोल्सन या अधिकाऱ्याला सहकारी कृषी बँकांचा अभ्यास करण्यासाठी पाठविले. सन १८९५ व १८९७ मध्ये अशा दोन टप्प्यांत त्यांचे अहवाल प्रसिद्ध झाले. त्याच वेळी दुसरे अधिकारी एच. ड्युपरनिक्स यांनी सन १९०० साली लिहिलेल्या आपल्या 'पीपल्स बँक फॉर नॉर्दर्न इंडिया' या पुस्तकात गाव पातळीवरील रायफिसन प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करण्याची शिफारस केली.

निकोल्सन आणि ड्युपरनिक्स यांनी मांडलेल्या विचारांनी अनेक अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेतले व त्यांनी सहकार कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीच पंजाब, उत्तर प्रदेश व बंगालमध्ये पुढाकार घेत मोजक्याच सहकारी संस्था स्थापन केल्या.

सहकाराचा इतिहास खूप मोठा व रंजक आहे. परंतु आज दिनांक १२ मे २०२५ रोजी दख्खनच्या उठावास १५० वर्षे होत आहेत. याच दिवशी सहकाराची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात व तेही पुणे जिल्ह्यात रोवली गेली याचा अभिमान संपूर्ण महाराष्ट्राला असायलाच हवा.

**– विद्याधर अनासकर** v _sanaskaryahoo.com

*****

# पतसंस्थेमधील गुंतवणुकीवरील परतावा आयकर मुक्त -सहकार आयुक्त तावरे




**राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष काका कोयटे परिसंवादात मार्गदर्शन करताना.**

**मुंबई** – रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने काढलेल्या कर्ज रोख्यांमध्ये सहकारी पतसंस्थांसाठी गुंतवणुकीची सुवर्णसंधी उपलब्ध आहे. ही गुंतवणूक वैधानिक तरलतेच्या निकषांत बसणारी असून त्यावर मिळणारा परतावा आयकर मुक्त असल्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या वतीने येथील वाय. बी. चव्हाण सभागृहात सहकारी पतसंस्थांच्या विविध अडचणी आणि राज्य बँकेच्या रोख्यांमधील गुंतवणूक या विषयावर एकदिवसीय परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. परिसंवादाला राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे आणि सहकार आयुक्त दीपक तावरे अध्यक्षस्थानी होते. परिसंवादात राज्यातील सहकारी पतसंस्थांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींबाबत सविस्तर चर्चा झाली. व्यासपीठावर सहकार खात्याच्या बँकिंग विभागाचे अधिकारी अनंत कटके आणि सहनिबंधक नितीन काळे होते.

मलकापूर अर्बन को-ऑप. सहकारी बँक व नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेत अडकलेल्या ठेवी तातडीने परत मिळविण्याची मागणी फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांनी केली. तसेच सहकार खात्याचे कामकाज ऑनलाईन करण्याची गरज सांगितली. थकबाकीविषयक प्रकरणांचा निकाल कलम १०१ अंतर्गत त्वरित लावावा, असेही नमूद केले. अपसेट प्राईस वेळेत निश्चित करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांची नुकतीच नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सल्लागार मंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांनी शेतकऱ्यांसाठी एक रकमेच्या परतव्याची चांगली योजना सुरू केल्याने आगामी सहा महिन्यांत ही बँक आर्थिक अडचणीतून बाहेर येण्याची शक्यता आहे, असे ते म्हणाले.

अनास्कर म्हणाले की, राज्य सहकारी बँकेने त्यांच्या कर्ज रोख्यांवर साडे आठ टक्के व्याजदराने कर्ज सुविधा देण्याचा निर्णय घेतला आहे. या परिसंवादात राज्यातील विविध सहकारी पतसंस्थांनी एकूण ५० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची घोषणा केली. मलकापूर अर्बन बँकेतील ठेवीदारांचे प्रश्न मांडण्यासाठी फेडरेशनचे उपाध्यक्ष शांतीलाल शिंगी, संचालक राजाभाऊ देशमुख, आबासाहेब देशमुख यांनी तर ॲड. अंजली पाटील यांनी नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सहकारी पतसंस्थांच्या अडकलेल्या ठेवींबाबत भूमिका बजावली.

कार्यक्रमाला फेडरेशनचे संस्थापक वसंतराव शिंदे, उपाध्यक्ष शांतीलाल शिंगी, संचालक डॉ. अंजली पाटील, राजाभाऊ देशमुख, चंद्रकांत वंजारी, भास्कर बांगर, सुरेश पाटील, शरद जाधव आदींसह राज्यभरातील अनेक सहकारी पतसंस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# राज्यातील मत्स्यव्यवसाय क्षेत्राला कृषी दर्जा

## सवलतीच्या दरात वीजपुरवठा, किसान क्रेडिट कार्ड बँकांकडून कर्ज उपलब्ध

**मुंबई** – राज्यातील मच्छिमार आणि मत्स्यपालकांना कृषी क्षेत्राला देण्यात येणाऱ्या अनेक पायाभूत सुविधा आणि सवलती देण्यासाठी, राज्य सरकारने मत्स्य व्यवसायाला कृषी दर्जा देण्याचा निर्णय जाहीर केला. याला नुकतीच राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे राज्यातील मासेमारी व्यवसायाला दिलासा मिळाला आहे.



महाराष्ट्र एक कृषी-केंद्रित राज्य असून ग्रामीण अर्थव्यवस्था केवळ शेतीवरच अवलंबून नसून पशुपालन, मत्स्यपालन, फळे उत्पादन आणि भाजीपाला शेती यासारख्या संलग्न क्षेत्रांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. मत्स्य व्यवसाय क्षेत्राचे योगदान ओळखून, नितेश राणे यांनी या दर्जा बदलाची बाजू मांडली, ज्याला अलिकडच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. मासेमारी, मत्स्यपालन, मत्स्यबीज उत्पादन आणि संबंधित प्रक्रिया, साठवणूक आणि व्यवस्थापन कार्यात गुंतलेल्यांना आता अधिकृतपणे कृषी दर्जा देण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यातील मत्स्य उत्पादनात लक्षणीय वाढ होईल आणि मत्स्य व्यवसाय क्षेत्राद्वारे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील अशी अपेक्षा आहे. परिणामी, राज्य आणि केंद्र सरकारकडून कृषी क्षेत्राला उपलब्ध असलेल्या विविध सुविधा आणि सवलती आता मत्स्यव्यवसाय क्षेत्रालाही मिळतील.

जीआर अंतर्गत, मत्स्यशेती आणि मत्स्यसंवर्धन प्रकल्पांना कृषीदराने वीज मिळेल. किसान क्रेडिट कार्डचे फायदे मिळतील आणि कृषी दराने बँक कर्ज मिळेल. या व्यतिरिक्त, मत्स्यशेती करणारे कृषी क्षेत्रात प्रदान केल्याप्रमाणे कमी किमतीच्या विमा संरक्षणासाठी पात्र असतील. राज्य सरकारने सौरऊर्जेचे फायदे – पूर्वी फक्त शेतकऱ्यांसाठी होते मत्स्यव्यवसाय क्षेत्राला विस्तारित करण्यास देखील मान्यता दिली आहे.

या जीआरमध्ये प्रथमच मत्स्य व्यवसायाशी संबंधित विविध संज्ञा स्पष्टपणे परिभाषित केल्या आहेत, जसे की मच्छीमार, मत्स्यपालन करणारे, मत्स्यव्यवसायी, मत्स्यबीज उत्पादक आणि मत्स्य व्यवस्थापन व्यावसायिक. परिणामी, राज्यभरातील मत्स्यशेती क्षेत्राशी संबंधित मत्स्य उत्पादक आणि कामगारांना या ठरावाचा फायदा होईल.

# दि मालाड सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची बिनविरोध निवड



**मुंबई –** येथील दि मालाड सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक अविरोध पार पडली. बँकेच्या आगामी वर्षांच्या धोरणांना दिशा देणाऱ्या या निवडणुकीत सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

विनोद मिश्रा यांच्या नेतृत्वात निवडणूक दुसऱ्यांदा अविरोध पार पडली. संचालकांनी बँकेच्या सभासदांचे हित आणि बँकेची प्रगती जपण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

नवीन संचालक मंडळामध्ये अनुभवी बँकिंग क्षेत्रातील व्यक्ती तसेच सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश आहे. यामुळे बँकेला विविध क्षेत्रांतील ज्ञानाचा आणि अनुभवाचा लाभ होणार आहे. बँकेच्या कर्मचाऱ्यांनी आणि सभासदांनी या निवडीचे स्वागत केले आहे.

# दि कल्याण जनता सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी यशवंत पांगारकर

**कल्याण –** दि कल्याण जनता सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी यशवंत पांगारकर आणि उपाध्यक्षपदी एम. एल. पाटील यांची निवड करण्यात आली आहे. बँक संचालक मंडळाची बैठक नुकतीच झाली. त्यामध्ये वरील निर्णय एकमताने घेण्यात आला. नूतन अध्यक्ष पांगारकर हे संचालक म्हणून कार्यरत असून त्यांना व्यवस्थापन क्षेत्रातील दीर्घ अनुभव असून उपाध्यक्ष पाटील संचालक असून अभियंते म्हणून कार्यरत आहेत.

# सावंतवाडी अर्बन को-ऑप बँकेचे टीजेएसबी बँकेत विलिनीकरण

**सावंतवाडी –** सावंतवाडी अर्बन को-ऑप. बँकेचे नुकतेच टीजेएसबी बँकेत विलीनीकरण करण्यात आले आहे. सावंतवाडी सहकारी बँकेच्या सर्वच्या सर्व ९ शाखा विलीन झाल्या आहेत. माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांनी सांगितले की, विलीनीकरणामुळे बँकिंग सेवा सर्वदूर पोहोचण्यास मदत होणार आहे. तसेच स्थानिक ग्राहकांना बळकट आर्थिक पर्याय मिळणार आहे आणि सहकारी बँकिंग क्षेत्र स्थिर होऊ शकेल.

टीजेएसबी बँक अध्यक्ष शरद गांगल यांनी सांगितले की, सहकारी बँकिंग क्षेत्रातील आमचा सहभाग अधिक व्यापक करीत आहोत. सिंधुदुर्ग जिल्हा आणि कोकण विभागातील विस्तार अधिक सक्षम होण्यास हातभार लागला आहे. यावेळी आमदार दीपक केसरकर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर यांनी मनोगत व्यक्त केले.






# अभिजित पाटील यांची मुक्त विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीवर निवड



अभिजित पाटील

**अलिबाग –** आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित सुरेश पाटील यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पतसंस्था व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम तज्ज्ञ सल्लागार समितीवर निवड करण्यात आली.

नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत पतसंस्था व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम सुरू करण्यात येणार आहे. शिक्षणक्रमाचा आराखडा आणि विषयनिहाय अभ्यासक्रम तयार करण्यात येत असून या शिक्षणक्रमाच्या प्रत्येक विषयासाठी विषय तज्ज्ञांची नेमणूक करण्यात आली आहे.

पतसंस्था आणि आधुनिक तंत्रज्ञान या विषयासाठी तज्ज्ञ सल्लागार समिती निवडण्यात आली आहे. प्रा. मनीष देशमुख हे या समितीचे अध्यक्ष आहेत. तज्ज्ञ सल्लागार समितीमध्ये आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील तसेच उत्तम गाडगे, संदीप कोयटे सदस्य आहेत. पाटील मागील तीन वर्षांपासून आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. दक्षिण कोरियामध्ये झालेल्या आशिया खंडातील सहकारी पतसंस्थांच्या प्रशिक्षण शिबिरासाठी त्यांची निवड झाली होती. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्थांचा महासंघातर्फे आयोजित प्रशिक्षण शिबिरांत तंत्रज्ञान यावर व्याख्यान देण्यासाठी त्यांना निमंत्रित करण्यात येते.

# 'महाराष्ट्र सहकारी मुद्रणालया'चे शिल्पकार : नरूभाऊ लिमये

**ज्येष्ठ पत्रकार, स्वातंत्र्यसैनिक, सहकार नेते स्व. नरुभाऊ लिमये यांच्या मार्गदर्शनाखाली 'महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय' ही संस्था स्थापन झाली. ही संस्था राज्यात मुद्रण क्षेत्रात एक अव्वल दर्जाची संस्था म्हणून काम करीत आहे. या संस्थेस नुकतीच पन्नास वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने विशेष लेख.....**




नरूभाऊ लिमये

पुण्यातील मुद्रण क्षेत्रात विसाव्या शतकाच्या सुरुवातीस नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी सर्व्हंट्स ऑफ इंडिया' या 'आर्यभूषण' संस्थेची स्थापना केली. त्या संस्थेने जनजागरणासाठी 'आर्यभूषण मुद्रणालय' आणि 'ज्ञानप्रकाश' दैनिक सुरू केले. 'आर्यभूषण भवन' ही भव्य वास्तू आणि परिसर चांगला जोपासला जावा म्हणून विश्वस्तांनी यशवंतराव चव्हाण यांना विनंती करून 'आर्यभूषण' परंपरा चालू ठेवली व त्यातून प्रिमियर प्रिंटर्स को-ऑप. संस्था' तीन जुलै १९७४ रोजी स्थापन करण्यात आली. २५ मे १९७५ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते संस्थेचे उद्घाटन करण्यात आले. महाराष्ट्रात राज्य पातळीवर सहकारी मुद्रणालयाचा प्रयोग नवीन होता. पण यशवंतराव चव्हाण व त्यांचे मित्र प्रा. गोवर्धन पारिख यांनी ही संस्था उभी केली. सहकार नेते शंकरराव कोल्हे, नरुभाऊ लिमये यांचा संस्थेच्या विकासात मोठा वाटा आहे. गोविंदराव तळवलकर, यशवंतराव मोहिते, वसंतदादा पाटील यांचेही त्यांना मोठे सहकार्य लाभले.

संस्थेच्या उभारणीत नरुभाऊ लिमये यांचा सिंहाचा वाटा आहे. पत्रकारिता, साहित्य, नाट्य आणि सहकारी आदी क्षेत्रांत काम करताना नरुभाऊंनी आपली प्रतिमा स्वच्छ राखली. समाजहिताची दृष्टी ठेवली. त्यांच्या कार्याचा आदर्श सतत राहावा म्हणून संस्थेने 'आर्यभूषण पुरस्कार' सुरू ठेवला आहे. महाराष्ट्रातील दोन पिढ्यांचे राजकारण पाहणारे निर्भीड पत्रकार, सिद्धहस्त लेखक म्हणून नरुभाऊ ओळखले जातात. पारदर्शक व्यक्तिमत्त्व, आदर्श सहकारी कार्यकर्ते मार्गदर्शक अशीही त्यांची ओळख तयार झाली, ती त्यांच्या चौफेर कर्तृत्वामुळे. ते जाऊन आता २७ वर्षे होत आली आहेत. तरुणांनाही लाजवेल अशी कार्यक्षमता, गुणवत्ता, अखंड वाचन करणारे नरुभाऊ सतत सभोवतालच्या माणसांच्या सुखदुःखाचा विचार करत असत.

नरुभाऊंचे आईवडील त्यांच्या लहानपणीच निवर्तले. त्याची त्यांना सतत जाणीव होती. त्यामुळे समाजातील शेकडो गरीब मुलामुलींना ते आर्थिक मदतीचा हात ते देत असत. 'सहकारी महाराष्ट्र'च्या संपादक पदावरून मी निवृत्त झालो, त्यावेळी निरोप समारंभानिमित्त नरुभाऊंनी मेजवानीचे आयोजन केले होते. त्या आठवणीने आजही मन भरून येते. नरुभाऊ कट्टर काँग्रेसवाले. बारा वर्षे ते आमदार होते. एक गरीब होतकरू मुलगा बोरीबंदर स्टेशनवर म्हणजे सध्याच्या छत्रपती शिवाजी टर्मिनसवर त्यांना नेहमी भेटत असे. त्याला मदत व्हावी यासाठी ते त्या मुलाकडून बुटांना पॉलिश करून घेत असत. एकदा गाडीला काही वेळ असल्याने त्यांनी त्या मुलाचे जीवन समजून घेतले. सुट्टीचा दिवस पाहून 'ना. म. जोशी मार्गा'वर ज्या ठिकाणी तो मुलगा राहत होता त्या ठिकाणी ते गेले. तेथील आरोग्यदृष्ट्या गलिच्छ वातावरण, दारिद्र्य पाहून त्यांना त्या मुलाची दया आली. नरुभाऊंनी त्या मुलाची पुण्यातील एका वसतिगृहात मोफत राहाण्याची, जेवणाची व्यवस्था केली. त्याला शिकविले आणि नोकरीलाही लावले. हा मुलगा आपल्या कर्तृत्वाने अधिकारी बनला आणि त्याने स्वतःचे घर बांधले. त्या घराला त्याने 'नरुभाऊ लिमये स्मृती' असे नाव दिले. अशा किती तरी मुलांना त्यांनी मदत केली. जात, धर्म या पलीकडे जाऊन ते विचार करीत असत.

समाजातल्या अशा किती तरी गरजू मुलांसाठी त्यांनी उपक्रम राबविले होते. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावर एक ध्वनिचित्रफीत तयार करून त्यांचे कार्य समाजात रुजविण्याचे काम नरुभाऊंनी निष्ठेने केले. राजकारण, समाजकारण, सहकार, पत्रकारिता, संगीत, कला या क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय होते. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी तुरुंगवास भोगला. १९६६ ते ७८ अशी बारा वर्षे ते आमदार होते. अनेक वर्षे नरुभाऊ महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयाचे ते अध्यक्ष होते. या संस्थेला त्यांनी दिशा दिली. कामगारांसाठी त्यांनी सहकारी तत्त्वांवर गृहबांधणी प्रकल्प राबविला. त्या काळात संस्था फायद्यात चालविली. राजकारणात, सार्वजनिक कार्यात, सहकारात, नाट्य-कला क्षेत्रात आणि पत्रकारितेत नरुभाऊंनी अनेकांना मार्गदर्शन केले. आणि मदतही केली. लोकशक्ती, विशाल सह्याद्री, प्रकाश या दैनिकांचे संपादन केले. दैनिक 'सकाळ'चे ते साताऱ्याचे बातमीदार होते. संपादक, स्तंभलेखक आणि बातमीदार अशा भूमिकेत ते सतत वावरले. रामशास्त्री बाण्याची पत्रकारिता निर्भय पत्रकारिता त्यांनी जपली. त्यांच्या कार्यात शिस्त होती. पत्रकार म्हणून महाभारतातील विदुराचा वारसा त्यांनी जपला. त्यांचे आत्मचरित्र 'वीस चोक ऐंशी' विशेष उल्लेखनीय असेच आहे. तसेच उद्योगपती डॉ. निळकंठराव कल्याणी यांचे चरित्र त्यांनी लिहिले. सहकारी मुद्रणालयाच्या कार्याला त्यांनी शिस्त आणली. कामगार, सेवक आणि संचालक मंडळ यांच्या कामात त्यांनी समन्वय साधून सहकार शिस्त लावली.



**ज्येष्ठ पत्रकार**
**जयराम देसाई**
**७६२०६ ९५१५५**

******



# रिझर्व बँक ऑफ इंडियाची शीघ्र सुधारकृती चौकट

नागरी सहकारी बँकांच्या नियंत्रणासाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाने १ एप्रिल २०२५ पासून नवीन चौकट तयार केली आहे. प्रॉम्प्ट करेक्टिव्ह ॲक्शन फ्रेमवर्क या नावाची नवीन नियमावली तयार करण्यात आली असून नागरी सहकारी बँकांसाठी पूर्वी असलेली सुपरवायझरी ॲक्शन फ्रेमवर्कही आता रद्द करण्यात आलेले आहे. नवीन चौकटीबाबतचे नियम पुढीलप्रमाणे आहेत.



डॉ. अभय मंडलिक

९४०३० ८०७२५

१) बँकेचे भांडवल विशेषतः पर्याप्त भाग भांडवल, कर्ज वसुलीची स्थिती आणि लाभक्षमता ही नव्या चौकटीची वैशिष्ट्ये असून यापुढे नागरी सहकारी बँकांना या तीन घटकांवर विशेष लक्ष द्यावे लागणार आहे.

२) यापुढे पर्याप्त भांडवलाचे प्रमाण, नेट एनपीएचे प्रमाण आणि बँकेला होत असलेला नफा हे तीन घटक नियंत्रणासाठी महत्त्वाचे ठरतील.

३) ही नियमावली सध्या टायर दोन तीन आणि चार या प्रवर्गातील नागरी सहकारी बँकांसाठी १ एप्रिल २०२५ पासून लागू करण्यात आली आहे.

४) टायर वन प्रवर्गातील नागरी सहकारी बँकांसाठी नियमावली योग्य वेळी जाहीर करण्यात येईल.

५) रिझर्व बँकेची कारवाई केव्हा सुरू होईल याबाबत त्यांनी मॅट्रिक्स जाहीर केले असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

६) मार्च २०२६ पर्यंत बँकेचे पर्याप्त भांडवल १२% इतके असले पाहिजे. बँकेचा नेट एनपीए सहा टक्क्यांच्या आत असला पाहिजे. बँकेला नफा झालेला असला पाहिजे, म्हणजेच मागील दोन वर्षी तोटा झालेला नसला पाहिजे.

वरील अटीत ज्या बँका बसणार नाहीत त्यांच्यावर रिझर्व बँक ऑफ इंडिया प्रॉम्प्ट करेक्टिव्ह ॲक्शनची कार्यवाही तातडीने सुरू करील. ॲक्शन घेण्याचा निर्णय ऑडिटेड बॅलन्स शीट पाठवल्यानंतर किंवा रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या इन्स्पेक्शननंतर वरील अटींचे पालन न झाल्यास तातडीने घेण्यात येईल.

७) पर्याप्त भांडवलाच्या बाबतीत जोखमींचे तीन प्रकार केलेले आहेत. पहिल्या प्रकारात पर्याप्त भांडवल साडेनऊ ते बारा टक्के असल्यास, दुसऱ्या प्रकारात आठ टक्क्यांपर्यंत असल्यास आणि तिसऱ्या प्रकारात ८ टक्क्यांच्या खाली असल्यास, प्रत्येक जोखमीसाठी वेगळ्या प्रकारची कारवाई रिझर्व बँकेतर्फे करण्यात येईल. थोडक्यात यापुढे म्हणजे मार्च २०२६ पासून पर्याप्त भांडवल १२ टक्के ठेवणे नागरी सहकारी बँकांसाठी क्रमप्राप्त राहील, हे न केल्यास रिझर्व बँकेच्या कारवाईला तोंड द्यावे लागेल.

८) एनपीएच्या बाबतीत तीन प्रकारचे नियम असून पहिला जोखमीचा प्रकार सहा ते नऊ टक्के, दुसरा नऊ ते बारा आणि तिसरा बारा टक्क्यांच्या पुढे असल्यास रिझर्व बँकेची तातडीने कारवाई सुरू होईल. याचाच अर्थ यापुढे कोणत्याही परिस्थितीत नेट एनपीए सहा टक्क्यांच्या आत ठेवणे आवश्यक आहे.

९) यापुढे नागरी सहकारी बँकांना दरवर्षी नफा कमावणे बंधनकारक आहे. सलग दोन वर्षे नफा न झाल्यास रिझर्व बँकेची कारवाई सुरू होऊ शकते. या पार्श्वभूमीवर लाभ प्रदतेकडे (Profitability) नव्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

**※ रिझर्व बँकेची कारवाई –**

वर नमूद केलेल्या मूलभूत अटींची पूर्तता न झाल्यास रिझर्व बँक तातडीने कारवाई सुरू करील. कारवाईचा तपशील खूप मोठा असून रिझर्व बँक ऑफ इंडियाला याबाबतीत फार मोठे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. कारवाई सुरू झाल्यावर बँकेच्या स्थितीमध्ये सुधारण्यासाठी वेळ दिला जाईल, त्या काळात संचालक मंडळाच्या ठराविक अंतराने रिझर्व बँकेसोबत बैठका होतील आणि सूचनांप्रमाणे निकाल येत आहेत की नाही यावर कटाक्षाने लक्ष दिले जाईल. बँकेच्या संचालक मंडळाला त्रुटींबाबत सुधारण्यासाठीची योजना सादर करावी लागेल आणि या योजनेबरहुकूम काम होते की नाही यावर रिझर्व बँकेचे बारकाईने लक्ष असेल.

**※ रिझर्व बँकेच्या कारवाईचे स्वरूप –**

रिझर्व बँकेची कारवाई सुरू झाल्यानंतर अपेक्षित सुधारणा न झाल्यास व्यवसाय प्रारूपाचा फेरविचार, कर्ज व्यवहारावर बंधने, गुंतवणुकीसाठी विशेष सूचना, ताळेबंदाच्या आकारावर नियंत्रण, शाखा विस्तारावर बंधने, भांडवली खर्चांवर बंधने आणि विलीनीकरणाचा सल्ला इत्यादी प्रकारची कारवाई होऊ शकते. परिस्थिती फारच बिघडल्यास बँकेचा परवाना रद्द करण्यापर्यंतची कारवाई रिझर्व बँक ऑफ इंडिया करू शकते. रिझर्व बँक ऑफ इंडिया कोणत्या प्रकारची कारवाई करू शकते, यासाठी मूळ परिपत्रकाचा अभ्यास करणे अपेक्षित आहे.

या परिपत्रकातील नियमावली शिवाय रिझर्व बँक ऑफ इंडियाचे बँकेच्या एकंदरीत कारभारावर पुरेसे लक्ष राहणार आहे. यामध्येही त्रुटी आढळल्यास रिझर्व बँकेला असलेल्या अधिकारांचा वापर करून कारवाई करण्यात येईल. या प्रकारची नियमावली व्यापारी बँकांसाठी गेल्या अनेक वर्षांपासून लागू आहे. नागरी सहकारी बँकांसाठी एक एप्रिल २०२५ पासून हे नियम लागू करण्यात आले आहे. रिझर्व बँकेच्या पद्धतीनुसार याबाबतचे परिपत्रक २६ जुलै २०२४ रोजी काढण्यात आलेले आहे. हे परिपत्रक बँकेच्या संचालक मंडळात चर्चेसाठी ठेवण्यात यावे आणि यातील प्रत्येक मुद्द्याचा तपशीलवार आढावा घेण्यात यावा हे अपेक्षित आहे.

बँकांवर दीर्घकाळ परिणाम करणारी ही नियमांची चौकट असून याकडे अत्यंत गंभीरपणे लक्ष देण्याची गरज आहे. प्रशिक्षणाच्या निमित्ताने प्रस्तुत लेखकाने या परिपत्रकाचा आढावा घेतला असताना अनेक बँकांना या परिपत्रकाचे गांभीर्य जाणवलेले नाही असे लक्षात येते. या परिपत्रकाची संचालक मंडळात नव्याने चर्चा करून या नियमाच्या चौकटी बाबत धोरणात्मक फेरआखणी करणे गरजेचे आहे. सर्व नागरी सहकारी बँकांनी या परिपत्रकाची पुरेशा गांभीर्याने नोंद घ्यावी.

**– डॉ. अभय मंडलिक**

**(लेखक खामगाव अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक व बँकिंग क्षेत्राचे अभ्यासक आहेत.)**

*****

# श्री आर्य चाणक्य नागरी सहकारी पतसंस्था प्रधान कार्यालयाचे उदघाटन

**कोल्हापूर –** कुठलीही सहकारी संस्था विश्वस्त भावनेने चालवली पाहिजे. सचोटीने, योग्य प्रकारे काम करून संस्थेच्या माध्यमातून गरजूंना मदत करता आली पाहिजे. उद्योग व्यापार उभे राहिले पाहिजेत. हे करत असताना संस्थेतील पैसा जनतेचा असल्याने तो सुरक्षित राहिला पाहिजे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

इचलकरंजी येथे 'श्री आर्य चाणक्य नागरी सहकारी पतसंस्था प्रधान कार्यालया'चे उदघाटन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. त्यावेळी ते बोलत होते पतसंस्थेचा मागील व यावर्षीचाही नेट एनपीए शून्य असून संस्थेचा निव्वळ नफा मागील वर्षी ३ कोटी आणि यावर्षी २ कोटी ९० लाख आहे. संस्थेच्या ठेवी मागील वर्षी १८६ कोटी व यावर्षी २२२ कोटी इतक्या झाल्या आहेत. संस्थेची गुंतवणुकीत वाढ झाली आहे.

यंदा आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष असून यानिमित्ताने देश आणि राज्यात सहकाराला मजबूत करण्याकरिता प्रयत्न केले जात आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी




पहिल्यांदा केंद्रीय सहकार मंत्रालयाची निर्मिती केली. त्या माध्यमातून सहकार क्षेत्राला नवी उभारी देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अशा परिस्थितीत श्री आर्य चाणक्य नागरी सहकारी पतसंस्थेसारख्या संस्था इतरांनाही निश्चितपणे प्रेरित करतील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

उच्च तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार धनंजय महाडिक, आमदार राहुल आवाडे पतसंस्थेचे पदाधिकारी व इतर उपस्थित होते.

# वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेचा पीजीडीएम अभ्यासक्रम सुरू



**पुणे –** भारत सरकारच्या सहकार मंत्रालयाने प्रोत्साहित केलेल्या तसेच राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषदेअंतर्गत कार्यरत असणाऱ्या वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था या संस्थेने नवीन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मान्यता असलेल्या दोन वर्षांच्या पीजीडीएम अभ्यासक्रमाची सुरुवात झाली.

उद्घाटन केंद्रीय सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ. आशिष कुमार भुतानी यांच्या हस्ते सहकार मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव पंकज कुमार बन्सल यांच्या उपस्थितीत झाले. वॅमनिकॉम आणि आंतरराष्ट्रीय कृषी बँकिंगमध्ये सहकार्य आणि प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. मोहंती यांनी स्वागत केले.

डॉ. मोहंती यांनी व्यवस्थापकीय शिक्षणाद्वारे सहकारी क्षेत्राला सक्षम बनविण्यात नवीन अभ्यासक्रमाचे धोरणात्मक महत्त्व अधोरेखित केले. सहकार विषयात विशेष असलेल्या या अभ्यासक्रमाच्या प्रारंभामुळे सहकार चळवळीसाठी व्यावसायिक प्रशिक्षण घेतलेल्या नेतृत्व वर्गाची निर्मिती करण्याच्या मंत्रालयाच्या प्रयत्नांमध्ये एक महत्त्वाचा टप्पा सर झाला आहे.

विद्यार्थ्यांना सहकारी संस्था आणि क्षेत्रात नवोन्मेष आणि शाश्वतता साधण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, कौशल्ये आणि नैतिक मूल्ये प्रदान करणे हे या अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट असून भविष्यकाळात याचा निश्चितच फायदा होणार आहे.

# जनसेवा सहकारी बँकेच्या वतीने जागतिक परिचारिका दिन उत्साहात साजरा

**पुणे –** येथील जनसेवा सहकारी बँकेच्या वतीने सर्व शाखांमध्ये जागतिक परिचारिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी त्या त्या परिसरातील रुग्णालयात कार्यरत असणाऱ्या परिचारिकांचा सन्मान बँकेच्या वतीने करण्यात आला.

परिचारिकांच्या कामाचा गौरव व्हावा, यासाठी दरवर्षी बँकेच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येतो अशी माहिती बँकेचे जनसंपर्क अधिकारी समीर करकीकर यांनी सांगितली. या कालावधीत बँक अधिकाऱ्यांनी परिचारिकांशी संवाद साधला.

# गणराया नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी बाळासाहेब कोंडे

**पुणे –** येथील गणराया नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी बाळासाहेब कोंडे यांची तर उपाध्यक्षपदी दत्तात्रय जरांडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. नितिन साळुंखे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.

संस्थेचे सध्या १३५० सभासद असून खेळते भांडवल अडीच कोटी इतके आहे. संस्थेच्या वतीने अनेकविध समाजोपयोगी उपक्रम करण्याबरोबर खातेदारांना कर्ज पुरवठा करण्यात येतो. संस्थेची स्थापना विश्वासराव जगताप यांनी केली आहे.

# भारत रत्न सहकारिता सन्मानमध्ये देवगिरी नागरी सहकारी बँकेचे तिहेरी यश

## बँक अध्यक्ष किशोर शितोळे दुसऱ्यांदा 'बेस्ट चेअरमन'ने सन्मानित

**छत्रपती संभाजीनगर** – देवगिरी नागरी सहकारी बँकेला कार्यकुशलतेच्या आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या जोरावर 'भारत रत्न सहकारिता सन्मान २०२५' या राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार सोहळ्यात तीन मानाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत.

बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे बँकेने विविध क्षेत्रांत मोठी प्रगती केली आहे. त्यांच्या दूरदृष्टी, सामाजिक बांधिलकी आणि सहकार क्षेत्रातील योगदानाची दखल घेत 'बेस्ट चेअरपर्सन ऑफ द इयर' हा बहुमान त्यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार शितोळे यांना सलग दुसऱ्या वर्षी मिळाला आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांना सहज, सोप्या आणि सुरक्षित सेवा देण्याच्या दृष्टीने बँकेने घेतलेले पुढाकार हे 'बेस्ट मोबाईल बँकिंग' पुरस्कारासाठी निर्णायक ठरले. सहकार क्षेत्रातील 'बेस्ट अर्बन कोऑपरेटिव्ह बँक'चाही बहुमान मिळाला.

मुंबई येथे पार पडलेल्या गौरव सोहळ्यात देवगिरी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे, संचालक अॅड. मुकेश गोयंका, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे आणि अधिकारी विश्वजित देशपांडे हे उपस्थित होते.

# नागपूर नागरिक सहकारी बँकेचा ३४५१ कोटीचा विक्रमी व्यवसाय




**नागपूर** – येथील नागपूर नागरिक सहकारी बँकेने ३४५१ कोटींचा विक्रमी व्यवसाय केला असून सुमारे १६.५४ कोटीचा नफा मिळविला आहे. नजीकच्या काळात बँकेच्या वतीने मोबाइल बँकिंग सुविधा सुरू करणार आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष प्रा. संजय भेंडे यांनी सांगितली. बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यामध्ये अध्यक्ष भेंडे यांनी माहिती सांगितली.

अध्यक्ष भेंडे यांनी सांगितले की, बँकेने नफा मिळविण्याची परंपरा कायम ठेवली असून ग्राहकांना विविध सेवा देण्यासाठी बँक प्रयत्नशील आहे. बँकेच्या एकूण ठेवी २०७५ कोटी तर कर्ज वाटप १३७६ कोटी इतके आहे. मुख्य म्हणजे एनपीएचे प्रमाण शून्य टक्के आहे तर बँकेचा सीआरएआर १४.२६ टक्के इतका आहे. स्वनिधी १२६ कोटी असून भाग भांडवलात २.७९ कोटीची वाढ झाली आहे. तसेच कर्मचाऱ्यांना १७ टक्के वेतनवाढ देण्यात आली आहे तर ८ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे.

सूत्रसंचालन मुख्य कार्यकारी अधिकारी आशुतोष पाठक यांनी तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेश एदलाबादकर यांनी नवीन सुविधांची माहिती सांगितली. संजय ठाकर यांनी आभार मानले.


कर व व्यापारी विषयक कायद्यातील क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत माहितीसह आर्थिक गुंतवणूक, आरोग्याविषयी माहिती देणारे व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०

**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

मासिकाची वर्गणी खालील प्रकारे भरु शकता.

| | वर्ष ३ | वर्ष २ | वर्ष १ |
|---|---|---|---|
| साध्या पोस्टाने | २५०० | १७०० | ९०० |
| रजिस्टर पोस्टाने | ३६०० | २४०० | १२६० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com




# सहकारी बँकेतील सीईओसाठी एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम सुरु होणार



**पुणे** – नागरी सहकारी बँकेतील मुख्य कार्यकारी अधिकार्यांसाठी एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम जून महिन्यापासून पुणे नागरी सहकारी बँक असोसिएशन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी सांगितली. असोसिएशनचा ८६ वा वर्धापनदिन नुकताच साजरा करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष मोहिते, तसेच संचालक, अधिकारी यावेळी उपस्थित होते. डॉ. काळकर म्हणाले की, केंद्र सरकारने नव्याने एक अभ्यासक्रम सुरू केला आहे. यामध्ये वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांना बँकांमध्ये काम करण्याची संधी मिळाल्यास बँकांना चांगल्या प्रकारचे मनुष्यबळ मिळणार आहे.

पुण्यातील सुमारे १५ सहकारी बँका बंद होण्यामागची करणे लक्षात घेतली पाहिजेत. त्यामुळे बँकिंग क्षेत्रात जोखीम वाढत असल्याने बँक संचालकांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे, असे अनास्कर यांनी सांगितले. सुरुवातीला अध्यक्ष मोहिते यांनी असोसिएशनच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा आढावा घेतला. तसेच असोसिएशनच्या वतीने विविध उपक्रम सदस्यांसाठी राबविण्यात येत आहेत आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळतो आहे, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमात बँकिंग आशय अभिप्राय वर्धापनदिन विशेष अंकाचे प्रकाशन करण्यात आले. चंद्रकांत शेळके यांनी सूत्रसंचालन, तर संचालक निलेश ढमढेरे यांनी आभार मानले.

## अजिंक्यतारा सहकारी सूत गिरणी अध्यक्षपदी उत्तमराव नावडकर, उपाध्यक्षपदी अजित साळुंखे





**सातारा** – येथील अजिंक्यतारा सहकारी सूत गिरणीच्या अध्यक्षपदी उत्तम विठोबा नावडकर तर, उपाध्यक्षपदी अजित सदाशिव साळुंखे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्रीमती उज्वला पळसकर यांनी काम पाहिले.

निवडीनंतर संस्थेचे मार्गदर्शक संचालक, महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी नवनिर्वाचित पदाधिकारी यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

संचालक अशोक काठाळे, गणपतराव मोहिते, आबासाहेब साबळे, संजय कदम, अशोक कदम, रघुनाथ जाधव, उल्हास भोसले, शिवाजी भोसले, सुरेश टिळेकर, जगन्नाथ किर्दत, बापूराव महाडिक, भरत मतकर, शशिकांत जाधव, साधना फडतरे आदी उपस्थित होते.

नूतन पदाधिकाऱ्यांच्या बिनविरोध निवडीनंतर संचालक, अधिकारी आणि कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## अजिंक्यतारा कारखान्याचा ऊस तोडणी वाहतूक करार

**सातारा** – येथील अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याच्या आगामी गळीत हंगाम २०२५-२६ च्या ऊस तोडणी वाहतुक कराराचा शुभारंभ कारखान्याचे अध्यक्ष यशवंत साळुंखे, उपाध्यक्ष नामदेव सावंत, कार्यकारी संचालक जिवाजी मोहिते यांच्या हस्ते करण्यात आला.

सन २०२५- २६ चा गळीत हंगाम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक ती ऊस तोडणी - वाहतुक यंत्रणा भरणेत यावी. जास्तीत जास्त यंत्रणा हजर राहिली पाहिजे, तसेच कार्यक्षेत्रातील जी वाहतुक यंत्रणा इतरत्र गेली आहे त्याही यंत्रणा पुन्हा आपल्या कारखान्याकडे कसे येतील हे पहावे, अशा सुचना उपाध्यक्ष सावंत यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

कारखान्याचे कार्यकारी संचलाक जिवाजी मोहिते यांनी ऊस तोडणी मजूरांचा वाढता प्रश्न विचारात घेवून या हंगामाकरिता ऊस तोडणी मशिन जादा घेणे आवश्यक असल्याचे सांगीतले. कारखान्याचे माजी अध्यक्ष सर्जेराव सावंत, माजी अध्यक्ष रामभाऊ जगदाळे, कारखान्याचे संचालक नितीन पाटील, वसंत पवार, अजिंक्यतारा ऊस तोडणी वाहतूक संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत घोरपडे, माजी अध्यक्ष बाळकृष्ण फडतरे, संचालक मंडळ, कारखान्याचे मुख्य शेती अधिकारी विलास पाटील, शेती अधिकारी लालसिंग शिंदे, सेक्रेटरी बशीर संदे, वाहतूक संस्थेचे व्यवस्थापक पैगंबर शेख तसेच कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी आणि ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदार उपस्थित होते.

## योगीराज सहकारी पतसंस्थेचा २९ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

**पुणे** – योगीराज सहकारी पतसंस्थेचा २९ वा वर्धापनदिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. पतसंस्थेचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी, ग्राहक, खातेदार उपस्थित होते. सहकार भारतीचे माजी प्रदेशाध्यक्ष मुकुंद तापकीर, माजी महापौर दत्तात्रय गायकवाड यांच्या हस्ते विविध पुरस्कार आणि सत्कार करण्यात आले.

तसेच संस्थेचे सभासद आणि कर्मचारी यांना कर्ज वितरण करण्यात आले आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आणि माजी नगरसेवक ज्ञानेश्वर तापकीर यांनी संस्थेच्या प्रगतीची माहिती सांगितली. रविंद्र घाटे यांनी आभार मानले.

## जिल्हा दूध उत्पादक संघाच्या गोकुळ अध्यक्षपदी नवीद मुश्रीफ

**कोल्हापूर** – येथील जिल्हा दूध उत्पादक संघाच्या गोकुळ अध्यक्षपदी नवीद मुश्रीफ यांची निवड करण्यात आली आहे. या दूध संघाचे २० हजार सदस्य आणि २३ संचालक आहेत. विभागीय उपनिबंधक राजकुमार पाटील यांच्या अध्यक्षतेखाली अध्यक्षपदाची निवडणूक पार पडली.

## विभागीय सहनिबंधक सहकारी संस्थेत वृक्षारोपण

**मुंबई** – आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आणि पर्यावरण दिनानिमित्त विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था आणि स्प्लेंडर काम्प्लेक्स को-ऑप. हाउसिंग सोसायटी संस्थेचे अध्यक्ष पवनकुमार शर्मा यांच्या पुढाकाराने संस्थेच्या आवारात आणि आरे कॉलनीमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. खासदार रविंद्र वायकर, उपनिबंधक संजय गाडे पाटील, आयआरएस समीर वानखेडे सहकार भारती मुंबई अध्यक्ष राहुल पाटील यांच्या उपस्थितीत मोहीम राबवली.

# संचालक व ठेवीदारांना प्रशिक्षणाची गरज - अनास्कर यांची सूचना

**नाशिक –** बॅलन्स शीट वार्षिक सभा काय असते, ठेवी ठेवलेल्या पतसंस्थेची परिस्थिती कशी आहे, याची साक्षरता ठेवीदारांना आल्यास त्यांचा विश्वास हा पतसंस्थांवर कायम राहील. त्यामुळे संचालकांना प्रशिक्षण महत्त्वाचे आहे. मात्र त्याहीपेक्षा ठेवीदारांना प्रशिक्षण देणे काळाची गरज असल्याचे महाराष्ट्र राज्य सहकारी बँक तथा शिखर बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी केले.




जिल्ह्यातील आदर्श पतसंस्थांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी व त्यांचे मनोबल वाढून त्यांच्या कार्याला स्फूर्ती मिळावी या उद्देशाने दैनिक 'देशदूत'च्या वतीने व नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन, यांच्या सहकार्याने 'आदर्श पतसंस्था पुरस्कार हा सोहळा पार पडला. याप्रसंगी अनास्कर बोलत होते.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था फयाज मुलानी, एम्पायर स्पाइसेस अँड फूड्स लिमिटेडचे अध्यक्ष ज्येष्ठ उद्योजक हेमंत राठी, दि महाराष्ट्र राज्य अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक फेडरेशनचे अध्यक्ष सी.ए. अजय ब्रम्हेचा, नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थांचे सहकारी फेडरेशनचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, देशदूत वृत्तपत्र समूहाचे संचालक विक्रम सारडा, संपादक डॉ. वैशाली बालाजीवाले, सल्लागार संपादक शैलेंद्र तनपुरे, जाहिरात महाव्यवस्थापक अमोल घावरे उपस्थित होते.

*** कर्जदाराने उत्पन्नक्षम बनावे –**

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नाशिक शहर व जिल्ह्यातील विविध १५ पतसंस्थांना सन्मानित करण्यात आले. अनास्कर म्हणाले की, एनपीएचा जास्त विचार न करता कर्जदाराने उत्पन्नक्षम बनावे, यासाठी सहकारी संस्थांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कर्जदाराच्या व्यवसायाशी संस्थांनी सतत संपर्कात राहिले पाहिजे. तळागाळातील पैसा अर्थव्यवस्थेत आणण्याचे काम पतसंस्था करत असतात. तरुणाई सहकारापासून बऱ्यापैकी अलिप्त असून तरुण वर्गाला आकर्षित करण्यासाठी पतसंस्थांनी प्रयत्न करावे. केरळ सरकारने त्यांच्या कायद्यामध्ये यूथ को-ऑपरेटिव्ह संकल्पना आणून त्याचे कायद्यात रूपांतर केले. सहकाराच्या दृष्टीने प्रगल्भ असलेल्या महाराष्ट्रात देखील ही संकल्पना यावी असे मत मांडले.

डॉ. सुनील ढिकले यांनी सहकार चळवळ कशाप्रकारे महाराष्ट्रात रुजली त्याबद्दल माहिती सांगितली नाशिक जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या अडीअडचणी समजून घेण्यासाठी फेडरेशनची स्थापना उत्तमराव ढिकले यांनी केल्याचे त्यांनी सांगितले. संपूर्ण महाराष्ट्रात फेडरेशन उत्तम कार्य करणारी संस्था म्हणून कार्यरत असल्याचेही त्यांनी सांगितले.

*** पतसंस्थेची पत वाढविण्याची भूमिका महत्त्वपूर्ण –**

पतसंस्थेने तळागाळातील लोकांची पत वाढवून त्यांना सक्षम बनवले. आज या ठिकाणी सन्मान होत असलेल्या पतसंस्थांची निवड योग्य प्रकारे केली आहे. आजच्या पुरस्काराने सहकारी संस्थांची जबाबदारीदेखील वाढल्याचे ब्रह्मेचा यांनी सांगितले. पुरस्कारार्थींच्या वतीने, स्व. अशोकराव बनकर नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष रामभाऊ माळोदे, दि विजय अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष राकेश चव्हाण आणि जनसेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांचे अध्यक्ष तुषार बोथरा यांनी मनोगत व्यक्त केले. संपादक डॉ. बालाजीवाले यांनी प्रास्ताविकात सहकार चळवळीची माहिती सांगितली. देशदूत कायमच चळवळीसोबत उभे राहिलेले दैनिक आहे. समाजात चांगले कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या मागे उभे राहण्याचे काम नेहमी करतो. सूत्रसंचालन अमित उपाध्ये यांनी केले आभार सल्लागार संपादक शैलेंद्र तनपुरे यांनी मानले.

*** दीड वर्षात जिल्हा बँक उर्जितावस्थेत येणार –**

नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या पुनर्जीवनासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न सुरू असल्याची माहिती अनास्कर यांनी सांगितली सर्व शेतकरी संघटना व शेतकऱ्यांसोबत जिल्हा बँकेच्या कार्यालयात काही दिवसांपूर्वी बैठक घेतली असून त्यांचे म्हणणे समजून घेतले आहे. शासन स्तरावर याविषयी भूमिका मांडली असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा बँकेवर संस्थात्मक सल्लागार म्हणून निवड होणार आहे. जिल्हा बँकेत अडकलेल्या ठेवी संपूर्णतः सुरक्षित राहील अशी हमी दिली. जिल्हा बँकेला लागणारी सर्व लिक्विडिटी पुरवण्याचे काम राज्य शिखर बँकेने मंजूर केले आहे. दीड वर्षाच्या आत सर्व पतसंस्थांना जिल्हा बँकेत अडकलेले पैसे हे परत मिळतील. अडकलेल्या पैशांची हमी सरकारकडून घेतली जाईल, असे सुतोवाच त्यांनी केले.

# सहकारी बँकासमोरील अडचणीबाबत बैठकीत विचार विनिमय

**पुणे –** सहकार क्षेत्रात काम करताना येणाऱ्या अडचणी आणि अम्ब्रेला ओर्गनायझेशन बाबत राज्यातील प्रमुख सहकारी बँकाची एक बैठक नुकतीच वैकुंठ मेहता राष्ट्रीय प्रशिक्षण संस्थेत पार पडली. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आरबीआय संचालक सतीश मराठे, सहकार आयुक्त दीपक तावरे, ऑर्गनायझेशन अध्यक्ष ज्योतींद्रभाई मेहता आदी यावेळी उपस्थित होते. पंढरपूर अर्बन बँक मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे यांनी सहकारी बँकेसमोरील अडचणी आणि अन्य बाबी याबाबतचे निवेदन सादर केले. त्यानंतर बैठकीत त्यामध्ये व्यापक स्तरावर चर्चा झाली.

# सहकारी बँकांनी ग्राहक, लोकाभिमुख व्हावे - उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे** – जागतिक, राष्ट्रीय, राज्य, जिल्हा आणि सहकारी बँका असे जाळे सर्वत्र पसरले आहे. सायबर क्राईम मोठ्या प्रमाणात वाढले असून हे अत्यंत अडचणीचे आहे. बँकांचे संचालक मंडळ हे मालक नसून विश्वस्त आहेत. सभासद हे खरे मालक असून त्यांचे हित जपणे गरजेचे आहे. त्यासाठी सहकारी बँकांनी ग्राहक व लोकाभिमुख व्हायला हवे, असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.



रामराज्य सहकारी बँकेच्या नव्या वास्तूचा कोनशिला उद्घाटन आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार चेतन तुपे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, बँकिंग तज्ज्ञ विद्याधर अनास्कर, रामराज्य बँकेचे संस्थापक विजय मोहिते, ॲड. सुभाष मोहिते, अध्यक्षा नंदा लोणकर, उपाध्यक्ष शिरीष मोहिते यांसह बँकेचे सर्व संचालक व व्यवस्थापकीय मंडळातील सदस्य उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, सहकार आणि कायद्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. सहकार क्षेत्राबद्दल लोकांमध्ये आपलेपणाची भावना रुजणे गरजेचे आहे. राजकारण बाजूला ठेवून बँकिंग पलीकडे पाहण्याची आवश्यकता असून त्यामधील सुधारणांकरिता समिती स्थापन करून पुढे वाटचाल करू. महाराष्ट्रात सहकारी चळवळ वाढली आणि रुजविली गेली. त्यामध्ये अनेकांचे योगदान आहे. गुजरात आणि महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळ वाढीला लागली आहे. यामध्ये विश्वासाहर्ता हा महत्त्वाचा घटक असून तो जपणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

ॲड. मोहिते म्हणाले, बँकेचे आजमितीस ११ हजार सभासद आहेत. समाजातील शेवटचा माणूस बँकिंगशी जोडला जावा, हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलेला संदेश आम्ही पूर्ण करीत आहोत. विजय मोहिते म्हणाले, ज्या भागात सुविधा नाहीत, तिथे बँकिंग करायचे हे आम्ही ठरविले होते. स्पर्धेपेक्षा लोकांना सेवा देण्याचे काम करीत आहोत.

अध्यक्ष लोणकर म्हणाल्या, बँकेच्या पहिल्या वास्तूचे उद्घाटन झाले. तळागाळातील लोकांना मदत व्हावी, या त्यामागील उद्देश होता. बँकेच्या ८ शाखा असून मार्च २०२५ अखेर १७० कोटी रुपयाच्या ठेवी आणि ९६ कोटी रुपयांची कर्ज बँकेने दिली आहेत. तब्बल ३ हजार ५०० चौरस फुटाची मालकीची वास्तू बँकेने घेतली असून मुख्य कचेरी आणि बिबवेवाडी शाखा येथे सुरू आहे.

# सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था आयोजित प्रशिक्षण यशस्वी

**रायगड** – सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेच्या वतीने पाटण येथे सहकार क्षेत्रातील पतसंस्थेतील अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व व्यवस्थापक वरिष्ठ अधिकारी यांच्यासाठी दोन दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

प्रशिक्षणास इम्पेरियल गोल्ड मॅनेजमेंट कंपनीचे सीईओ व सहकार प्रशिक्षक रुपेश कुंभार, राज्य फेडरेशनचे उपाध्यक्ष संदीप माळी, सहकार भारती प्रदेश कार्यकारिणी सदस्य अश्विनी आठवले सांगली जिल्हा पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख जगदिश काळगावकर अक्षय पिसे रायगड जिल्हा सहकार भारती अध्यक्ष प्रा. मेघराज जाधव विंडी हिल्सचे संचालक दिलीप जोगळेकर आदी उपस्थित होते.

प्रशिक्षक रुपेश कुंभार यांनी उदिष्ट व उद्दिष्ट पूर्तीची कार्यवाही, ताळेबंद विश्लेषण, बजेट, संस्था ओळख, मार्केटिंग या विषयांवर पीपीटीद्वारे अभ्यासपूर्ण विवेचन करून प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन शंका समाधान केले. मुरुड-जंजिरा, करगणी, मुरगूड, पलूस, कुंडल, तासगांव, कराड अशा विविध ठिकाणांहून संचालक, व्यवस्थापक, वरिष्ठ अधिकारी मिळून ३१ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. त्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.

प्रा. मेघराज जाधव, जगदीश काळगावकर, हेमंत पराडकर यांनी प्रशिक्षणातील विषय पतसंस्थेच्या कामकाजात निश्चितपणे उपयोगी पडतील असा विश्वास व्यक्त करत सहकार भारतीचे आभार व्यक्त केले. प्रशिक्षण यशस्वितेसाठी अश्विनी आठवले, दिलीप जोगळेकर जगदीश काळगावकर अक्षय पिसे यांनी परिश्रम घेतले.

# 'बेस्ट चेअरमन ऑफ दि इयर' पुरस्काराने अध्यक्ष सुभाष मोहिते सन्मानित



**पुणे** – पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष मोहिते यांना नुकतेच एका समारंभात 'बेस्ट चेअरमन ऑफ दि इयर' या पुरस्काराने गौरविण्यात आले केंद्र सरकारच्या संचार मंत्रालयाचे उपमहानिदेशक सुमनेश जोशी आणि एनयूसीएफडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रभात चतुर्वेदी हे यावेळी उपस्थित होते.

असोसिएशनचे संचालक म्हणून गेली २० वर्ष मोहिते कार्यरत आहेत. नागरी सहकारी बँकांच्या विविध समस्याची सोडवणूक करण्याचे काम सातत्याने ते करीत आहेत.

# सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
# महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**

# सहकार महर्षी




**सहकार चळवळीतील प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा ग्रंथ**

**सहकार महर्षी ग्रंथ - प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)**

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | - | रु. १५००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | - | रु. १३५०/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | - | रु. १२००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

**UPI ID SahakarSugandha@SBI**
सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

**बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!**

# सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी सहकार विभाग तत्पर : पुणे शहर जिल्हा उपनिबंधक संजय राऊत यांची ग्वाही



**पुणे** – गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या पुनर्विकासासाठी तसेच कन्व्हेअन्स आणि डिम्ड कन्व्हेअन्स प्रक्रिया राबविण्यासाठी सहकार विभाग कायम तत्पर असून यातील कायदेशीर बाबी समजावून सांगण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली असल्याचे सहकार विभागाच्या पुणे शहराचे जिल्हा उपनिबंधक संजय राऊत यांनी सांगितले.

महाराष्ट्र सोसायटीज वेलफेअर असोसिएशन (महासेवा) आणि को-पेक्स-दी को-ऑपरेटिव्ह एक्स्पर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कन्व्हेअन्स, पुनर्विकास व स्वयं-पुनर्विकास जनजागृती' यावर चर्चासत्र पार पडले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राऊत यांनी याबाबत आवश्यक कागदपत्रे, नोंदणी प्रक्रिया व सहकार खात्याच्या विविध यशस्वी उपक्रमांची सखोल माहितीदेखील यावेळी दिली.

प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा उपनिबंधक संजय राऊत, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था व अपार्टमेंट फेडरेशनचे अध्यक्ष सुहास पटवर्धन, ज्येष्ठ विधीज्ञ व निवृत्त आयएएस अधिकारी श्यामसुंदर पाटील आणि महासेवाचे संस्थापक अध्यक्ष सीए रमेश प्रभू उपस्थित होते. या निमित्ताने पुनर्विकास व स्वयं-पुनर्विकास यावरील माहितीपर पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

सुहास पटवर्धन यांनी पुनर्विकास प्रक्रियेत व्यावसायिक व तज्ज्ञांच्या योग्य मार्गदर्शनाचे महत्त्व विशद केले.सहकारी संस्थांनी योग्य नियोजन व नियोजनबद्ध कार्यपद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन केले. श्यामसुंदर पाटील यांनी कन्व्हेअन्स व डिम्ड कन्व्हेअन्स प्रक्रियेत येणाऱ्या विविध अडचणी, स्टॅम्प ड्युटी संबंधित समस्या याबाबत मार्गदर्शन केले. तसेच या समस्यांचे प्रभावी निराकरण करण्याच्या उपाययोजना स्पष्ट केल्या. सीए रमेश प्रभू यांनी स्वयं-पुनर्विकासाच्या गरजेवर प्रकाश टाकत रेरा कायद्याखालील पारदर्शक आणि नियमबद्ध प्रक्रियेचे महत्त्व सांगितले आणि व्यावसायिक सल्लागारांच्या भूमिकेबाबतही उपस्थितांना बहुमूल्य माहिती दिली.

चर्चासत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी व सदस्य, ज्येष्ठ विधीज्ञ चार्टर्ड अकाऊंटंट, बांधकाम व्यावसायिक आणि संबंधित क्षेत्रातील अनेकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. चर्चासत्राचे सूत्रसंचालन सीए चैतन्य वाखारिया यांनी केले. महासेवा पुणे अध्यक्ष सीए सचिन शर्मा, को-पेक्सचे संस्थापक सीए दिपेश पटेल सीए ऋषिकेश कोठावळे यांनी आभार मानले.

## लोकोपयोगी कामे गतीने होण्यास प्रशासनाचा हातभार लागावा - राज्यपाल बागडे

**छत्रपती संभाजीनगर** – सहकारी संस्थाच्याकडून विविध प्रस्तावाबाबत येणाऱ्या फायलींना प्रशासनाने प्राधान्य द्यावे, तरच लोकोपयोगी विकास कामे गतीने होण्यास मदत होणार आहे, असे मत राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी व्यक्त केले आहे. जाधववाडी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आंबा आणि मिलेट महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांच्या सुविधेसाठी पेट्रोल पंपाचे लोकार्पण कार्यक्रम झाला.

पालकमंत्री संजय शिरसाट, आमदार अनुराधा चव्हाण, कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक एन. बी. पाटील, महाकेशर आंबा बागायतदार संघ अध्यक्ष नंदू काळे उपस्थित होते. सभापती राधाकिसन पठाडे यांनी प्रास्ताविक तर राम शेळके यांनी आभार मानले.

## पतसंस्थांचे आर्थिक मापदंड, लेखापरिक्षण आदी विषयांवर प्रशिक्षण संपन्न

**रायगड** – आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष अंतर्गत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नागरी/ग्रामीण सहकारी पतसंस्थेसाठी एक दिवसीय प्रशिक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी जिल्हा उपनिबंधक प्रमोद जगताप होते.

राज्य समन्वयक धनंजय डोईफोडे यांनी प्रास्ताविकात सहकार क्षेत्र पुढे नेण्यासाठी राज्यभर प्रशिक्षण कार्यक्रम याबाबत माहिती सांगितली. प्रशिक्षणाच्या प्रथम सत्रात सायबर गुन्हे अन्वेषण तज्ञ संदीप गादिया यांनी सायबर सिक्युरिटी लेटेस्ट फ्रॉडस डिजिटल अरेस्ट या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन करुन संभाव्य धोक्यांपासून सावधानता बाळगावी असे आवाहन केले.

सरव्यवस्थापक महेश सहकारी बँक श्रीकांत जाधव यांनी बॅंकिंग व्यवहारातील धोक्याचे व्यवहार अँटी मनी लॉडरींग पतसंस्थांच्या कामकाजात कृतीत बुद्धीमत्तेचा वापर या विषयावर वेधचे संभाव्य प्रारूप उलगडून दाखवले. तसेच बॅंकिंग तज्ञ प्रमोद मेहता यांनी पतसंस्थेच्या ठेवी संकलन व गुंतवणूक व्यवस्थापन आणि प्रगत बॅंकिंग यावर मार्गदर्शन केले. लेखा परिक्षण या क्लिष्ट विषयावर सेवानिवृत्त सहनिबंधक तानाजी कवडे यांनी पतसंस्थांचे आर्थिक मापदंड या विषयावर ऑडिटसाठी उपयुक्त माहिती देत प्रशिक्षणार्थींचे उद्बोधन केले.

समारोप सत्रात सहाय्यक निबंधक सहकारी संस्था श्रीकांत पाटील यांनी सक्तीची वसुली या अत्यंत जोखमीच्या विषयावर प्रकाश टाकतांना कलम महाराष्ट्र अधिनियम कायदा १९६० अन्वये कलम ९१,१०१ तसेच १५६ चे वसुली अधिकाराविषयी माहिती देत वसुलीसंबंधी बारकावे विशद करुन पतसंस्थांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले.

प्रशिक्षणासाठी रायगड जिल्हयांतील १५ तालुक्यांतील एकूण १७५ सहभागी होते. प्रशिक्षणार्थींना प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात आली सूत्रसंचालन पवन पाटील यांनी तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मयूर शेळके, पवन पाटील, श्रीराज म्हात्रे, प्रशिक्षण समन्वयक यांनी परिश्रम घेतले.



THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL
Regd.No. YML/BNK/114
दि यवतमाळ अर्बन
को-ऑप बँक लि., यवतमाळ
|| साहसे श्री : प्रतिवसति ||
मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ - ४४५००१
Website : www.yavatmalurbanbank.com
अमृत वर्षा
पुनर्गुंतवणुक ठेव योजना
दि. ०१ एप्रिल २०२५ ते दि. ३१ मार्च २०२६
गुंतवणूक कालावधी
४४४ दिवसांकरिता
योजनेचा सामान्य व्याजदर 7.25%
केवळ ज्येष्ठ नागरिकांकरिता 7.75%
अधिक माहितीकरीता शाखा व्यवस्थापकाशी संपर्क साधावा.
| डॉ. नितीन खर्चे अध्यक्ष | अजिंदरसिंह चावला उपाध्यक्ष | श्रीधर कोहरे मुख्य कार्यकारी अधिकारी
संचालक - श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री.आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री.प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री.संजय चिंतामणराव डेहणकर, श्री.प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड.श्री.प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री.गोवर्धन दयाराम राठोड, श्री.परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ.श्री.महेश दामोधर सारोळकर, श्री.वसंता रामजी सुपारे, श्री.संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ.शिला राजेश्वर निवल, श्री.नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक), श्री.संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)

# नागपूर बँकेनंतर आता नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेवर संस्थात्मक सल्लागार

**पुणे –** नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर संस्थात्मक सल्लागार म्हणून राज्य सहकारी बँकेवर नव्याने जबाबदारी सोपविण्यात आली आहे, तसे आदेश सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी नुकतेच काढले आहेत.

यापूर्वी नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर संस्थात्मक प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्याचे सकारात्मक परिणाम दिसून आल्याने नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. नाशिक जिल्हा बँकेवर सध्या मोठ्या प्रमाणावर आर्थिक तोटा आहे.

राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, राज्याच्या सहकार क्षेत्रातील हा एक अभिनव प्रयोग आहे. आगामी दोन वर्षात नाशिक जिल्हा बँकेला सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. बँकेच्या सक्षमीकरणासाठी शासन आणि राज्य सहकारी बँकेचा हा संयुक्त प्रयत्न आहे.

आयुक्तांनी दिलेल्या आदेशात असे म्हटले आहे की, नाशिक बँकेवरील प्रशासकांनी बँक व्यवस्थापनास वेळोवेळी मार्गदर्शन करावे आणि आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना सुचवण्यात याव्यात.

## सहकार भारतीच्या पाठपुराव्यास यश

# तक्रारी बाबत निर्णय प्रक्रिया गतिमान होण्यासाठी ई-क्युजे प्रणाली कार्यरत

**सांगली –** राज्यातील सहकार क्षेत्राशी निगडीत असणाऱ्या अनेकविध सहकारी संस्थाबाबतच्या तक्रारी, सुनावणी आणि निर्णय तातडीने व्हावेत, यासाठी शासनाने नागरिकांच्या सोयोसाठी ई-क्युजे प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत सहकार भारतीने सातत्याने वरील मागणीसाठी पाठपुरावा केला होता.

तत्कालीन सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याकडे सहकार भारतीच्या वतीने मागण्यांचे निवेदन दिले होते. आणि सतत या मागणीसाठी पाठपुरावा केला. अर्धन्यायिक निर्णय प्रक्रिया, तसेच नोंदणी ऑनलाईन पद्धतीने व्हावी अशा विविध मागण्या होत्या. देशामध्ये सहकार चळवळीच्या क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर असून सध्याच्या स्थितीत सुमारे अडीच लाख संस्था कार्यरत आहेत.

नागरिकांच्या सोयीसाठी शासनाच्या ई-गव्हर्नस धोरणाअंतर्गत ई-क्युजे प्रणाली विकसित करण्यात आली आहे. सर्व सहकारी संस्थांचे कामकाज हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार निबंधकच्या वतीने करण्यात येते. या नवीन प्रणालीमुळे नागरिकांना घरबसल्या ऑनलाइन पद्धतीने सेवा सुविधा उपलब्ध होणार आहेत.

शासनाच्या निर्णयाबाबत प्रतिक्रिया देताना सहकार भारतीचे प्रदेशाध्यक्ष दत्ताराम चाळके यांनी सांगितले की, सहकार क्षेत्रातील काही विभागातील तक्रारीसाठी ऑनलाईन प्रक्रिया राबविण्यात यावी, अशी मागणी सहकार भारतीच्या वतीने करण्यात आली होती. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी याबाबत निर्णय घेतला आणि ही नवीन प्रणाली कार्यरत करण्यात आली आहे.


## सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड
### (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. व्यंकटेश कुलकर्णी (प्रशिक्षण प्रमुख) - ९४०३० ८०७५१**
**श्री. माधवेंद्र कोरडे - (फक्त मेसेजसाठी) ९८५०५ ७१४०५**
*** प्रशिक्षण कार्यालय -** फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ ई-मेल : sahakarbharati1416@gmail.com

सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती - संपादक

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

**श्री. विनायक भिसे :** रिजनल हेड (पश्चिम महाराष्ट्र व कोकण) 9923396312

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| सांगली | सौ. श्वेता कुलकर्णी | 8830837005 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर शहर | सौ. दिपाली कुलकर्णी | 9049785111 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| चाळीसगाव, जळगाव | ॲड. विकास देवकर | 7588440640 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| नाशिक | श्री. नितीन बीबीकर | 9665778497 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. अभय बावस्कर | 9422202569 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| लातूर | श्री. शरद दिवे | 8275020460 |
| परभणी | श्री. संतोष पाथरीकर | 9763012439 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |

**पुस्तकांसाठी संपर्क : ८८०५९ ८१६७३**

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-
वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

A/c Name : Sahakar Sugandha
Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.
(Sihagad Road, Pune Branch)
Current a/c No. : 078011100000065
IFS Code - DNSB0000078

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name : State Bank of India
(Hingne Khurd, Pune Branch)
Current a/c No. : 36931889346
IFS Code - SBIN0007159

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. sahakar.sugandha@gmail.com

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**

AURO®

SINCE 1948

ISO CERTIFIED ISO 9001 : 2008

BIS Certified

IS : 550 CM/L.No.7200069405 | IS : 550 CM/L.No.3740863 | IS : 550 CM/L.No.2863066 | IS : 550 BIS Certified



SALES & SERVICES

ALL MAHARASHTRA REGION

CASH SAFE I GOLD SAFE I VAULT I LOCKER CABINET

JEWELLER'S SAFE I PETROL PUMP SAFE

Our trusted partners for 75 years

Contact : Mrs. Suvarna Kshirsagar

Office Address : 1453, Shop No. 06, Shiv Parvati Society, Behind Janata Sahakari Bank. Khadilkar Path, Bajirao Road, Shukrawar Peth, Pune -411002

mtc1506pune@yahoo.com www.aurombica.com

7559283467 I 9685061515 I 9879791521

## आमच्या विविध कर्ज योजना



भारत सरकारकडून मिळणाऱ्या सबसिडीस पात्र
पीएम सुर्यघर मोफत विज योजनेअंतर्गत
**घरगुती रूफटॉप सोलर पॅनेलसाठी**
**विशेष कर्ज योजना**



**प्रधानमंत्री आवास योजना**
(शहरी २.०) अंतर्गत सबसिडीस पात्र
**आपले गृहस्वप्न**
साकार करणं इथं आता होईल सोप्पं!
गृहकर्ज व्याजदर फक्त




**शैक्षणिक कर्ज**

**अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.**
**मोबाईल : ७८८८००९७१८**

* नियम व अटी लागू

Since 1935
SUB
SUB का साथ, आपका विकास

# सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली

(शेड्युल्ड को-ऑप. बँक)

प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) १३७६२३६ /३७/३८

## सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध निर्मित

# नागरी सहकारी 2026 बँक / पतसंस्था दैनंदिनी

नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचा मराठीत संक्षिप्त गोषवारा तसेच QR कोडच्या मदतीने RBI ची सर्व मूळ परिपत्रके उपलब्ध असणारी एकमेव दैनंदिनी व नागरी सहकारी पतसंस्थेच्या दैनंदिनीमध्ये गेल्या तीन वर्षातील सर्व महत्वाच्या परिपत्रकांचा समावेश
**देशभरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या संख्येनुसार आर्थिक स्थितीच्या उपयुक्त माहितीसह...**




**नागरी सहकारी बँक दैनंदिनी २०२६**

किंमत रु. 500/-
अधिक प्रतींसाठी
विशेष सवलत
आजच नोंदणी करा!

किंमत रु. 400/-
अधिक प्रतींसाठी
विशेष सवलत
आजच नोंदणी करा!

**नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी २०२६**




सहकार भारतीचे मुखपत्र 'सहकार सुगंध' कार्यालय : ऑफिस नं. १५, विष्णुप्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३० मो. : 8805981673 ईमेल : sahakar.sugandha@gmail.com


उंच उंच शिखरे गाठती महिला,
त्यांच्या सन्मानार्थ जनसेवेच्या योजना !
0.25%
महिला सन्मान कर्ज सवलत
सर्व कर्ज योजनांवर महिलांना
व्याजदरात 0.25% सवलत !
(त्वरा करा, योजना मर्यादित कालावधीसाठी)
* अटी लागू
संपर्क क्र. - 84 85 87 12 52
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.
www.janasevabankpune.net

safeage
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



## All our Products are BIS Standards

Our Certificates

ISO 14001 : 2004
IS 5244 : 2014 CM/L-7500087614
IS 550 : 2014 CM/L-3978088
IS 11188 : 2014 CM/L-2870669
ISO 9001 : 2008



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor

**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**

**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.

Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur

We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,



स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
लोकमान्य अक्षय योजना
*10% व्याजदर प्रति वर्ष
१३ महिन्यांच्या ठेवीसह वाढवा आपली संपत्ती!
कालावधी १३ महिने
किमान गुंतवणूक १०,०००/-
ज्येष्ठ नागरिकांसाठी १०.५०% व्याजदर
स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : डॉ. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 | lokmanyasociety.org

**Registered - SAHAKAR SUGANDHA - RNI NO. MAHMUL/2005/16099**
**Magazine Post Reg. No. : MSD/057/2025**
**(Publication Date - 05/06/2025) Posting on 07/06/2025 Posting at Magazine Post, Mumbai PSO, Mumbai 400 001**




**प्रेषक :**
**सहकार सुगंध कार्यालय**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,
५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा,
सिंहगड रोड, पुणे – ४११०३०.
मो. : ८८०५९८१६७३

**प्रति,**